इच्छा, आकांक्षा, प्रवृत्ती, कला, अभिरूची इ. ने ते निर्धारित होते. व्यक्तीच्या पुरते ते खरे ठरते. दुसऱ्या व्यक्तीला सत्य हे सत्य म्हणून मान्य होईलच असे नाही. त्यातील व्यक्तीत जी मतभिन्नता दिसते ती खरी असते. दोन्ही व्यक्तींची मते ही सामान रूपात सत्य असतात. त्यापैकी एक अधिक स्वाभाविक असते त्याचा हा सिध्दांत संशयवादी होता.

प्रोटॅगोरास हा आधुनिक प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञानाच्या पुरोगामी विचारवंत होता. आधुनिक प्रत्यक्षवादाची मूळ बीजे ही त्याच्या अनुभववादी विचारसरणीत पाहावयास मिळतात.

प्रोटॅगोरास हा एक अत्यंत प्रभाव, चतुर व यशस्वी अध्यापक होता. तसेच तो भाषाशास्त्रज्ञ व अलंकारशास्त्रज्ञही होता. वक्तृत्व संभाषण व वादविवाद होण्यासाठी त्याने भाषाशास्त्र अधिक प्रभावी बनविले होता.

गॉर्जियास : (Gorgias) (इ.स.पू. ४८३ ते ३७५)

प्रोटॅगोरसच्या नंतर गॉर्जियास हा प्रसिध्द सोफिस्ट मानला जातो. वादविवाद, व्याकरण यांची त्याला आवड होती. त्याच्या मते, सत्य सापेक्ष असते, निरपेक्ष सत्य अशक्य असते. त्याने शून्यवाद व अज्ञेयवाद हे युक्तिवादाने प्रस्थापित केले ते असे.

१) जे आहे ते नाहीतून निर्माण होणार नाही, व आहेतून निर्माण झाले तर, ते निर्माण झालेले नाही. थोडक्यात 'काही नाही' हेच खरे.

२) काही असले तरी त्याचे खरे ज्ञान होणे शक्य नाही कारण ज्ञान होणे म्हणजे इंद्रियांनी अनुभवणे पण इंद्रियानुभवात चुका अथवा प्रमाद राहू शकतात. म्हणून ज्ञानप्राप्ती अशक्य आहे.

३) ज्ञान इतरांस करून देणे शक्य नाही कारण ज्ञान म्हणते इंद्रियानुभव व प्रत्येकाचा इंद्रियानुभव हा दुसऱ्यापेक्षा संक्रमित करता येत नाही.

गॉर्जियायसने तात्त्विक शून्यवादाचा पुरस्कार केला. त्याला इंद्रियजन्य सृष्टिचे निराकरण करावयाचे नव्हते तर अतींद्रिय अथवा परमार्थ सत्तेचे निराकरण करावयाचे होते. अशा प्रकारे गॉर्जियासने तत्त्वज्ञानाचा ओघ हा बाह्य सृष्टीकडून मानवाकडे वळविला. ज्ञानाचा मार्ग शोधण्याकडे त्याने आपली दृष्टि वळविली.



Chap. 1

प्रकरण १

# पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे स्वरूप

१) सॉक्रेटिसपूर्व तत्त्वज्ञान.

२) पाश्चात्य तत्त्वज्ञानाची मुख्य लक्षणे.

३) भारतीय तत्त्वज्ञान व पाश्चात्य तत्त्वज्ञान या दोन्हीतील फरक व तुलना.

## Q.No.1 १) सॉक्रेटिसपूर्व तत्त्वज्ञान

पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा विचार करीत असतांना सॉक्रेटिसच्या अगोदर काय स्थिती होती, याचा थोडक्यात परामर्श घेणे आवश्यक ठरते. ग्रीक देशात, सॉक्रेटिसच्या अगोदर सोफिस्ट संप्रदाय अस्तित्वात होता. 'सोफ' या शब्दापासून सोफिस्ट हा शब्द तयार झाला. 'सोफि' या शब्दाचा अर्थ 'बुध्दिमान्' व 'निपुण व्यक्ती' असा आहे. कालांतराने मात्र या लोकांना सोफिस्टस् असे म्हणण्यात येऊ लागले. कारण हे सर्व लोक समाजकार्य म्हणून शिकवित नव्हते तर, युवकाकडून पैसे घेऊन शिकवित असत. म्हणून त्यांना नुसते अध्यापक न म्हणता 'व्यावसायिक अध्यापक' (Professional Teacher) असे म्हणण्यात येऊ लागले. हे लोक पैसे घेऊन युक्त्या, परयुक्त्या करण्याचे तंत्र शिकवित असत.

सोफिस्टांनी अनेक तत्त्ववेत्त्यांचा अभ्यास केला आणि शेवटी ते या निष्कर्षापर्यंत पोहचले की, दोन तत्त्वज्ञांचे मतैक्य कधीच होऊ शकत नाही. प्रत्येक तत्त्वज्ञ हा आपआपला दृष्टिकोन मांडीत असतो. एखाद्याने पाण्याला आद्यतत्त्व मानले, तर एखाद्याने हवेला आद्य तत्त्व मानले. काही तत्त्वज्ञ एकतत्त्ववादी, तर काही तत्त्वज्ञ बहुतत्त्ववादी आहेत. त्याचप्रमाणे काहींनी परिवर्तनाला सत्य मानले आहे. तर काही जणांनी 'स्थिरत्व' हेच खरे सार होय हे सांगितले. या सर्व विचारांवरून एवढेच म्हणता येईल की, या जगाची उत्पत्ती किंवा या जगाचा विकास कसा झाला ? या संबंधी काय निर्णय घ्यावा, ते समजणे कठीण होते. किंबहुना अशा प्रकारचे आकलन करून घेत असतांना, अनेक अडचणी

घेतात. सामान्य माणसांना तर अशा तात्त्विक चर्चेत कसल्याही प्रकारची रूची नसते. सॉक्रेटिसपूर्व काळाती या बाबीला अपवाद नव्हते. त्याचप्रमाणे हे जग (World) खरोखर सत्य आहे काय ? या जगाची निर्मिती कशी झाली ? या सारख्या प्रश्नातही लोकांना मुळीच रूची नव्हती. कोणत्याही मनुष्याला, आपल्या जीवनाशी संबंधित असणाऱ्या विषयाची आवड वाटू लागते. जग मिथ्या आहे का ? जग मिथ्या नाही, जगाचे आदि द्रव्य पाणी आहे की हवा आहे ? यासारखे प्रश्न मुळातच शुष्क व कंटाळवाणे वाटत होते. अशा प्रकारचे विचार म्हणजे 'स्वैर कल्पना होत' अशीच लोकांची धारणा झाली होती अर्थात तसे होणे स्वाभाविकही आहे. तत्कालीन युवकांना राजकीय जीवनाचे आकर्षण होते. त्याचप्रमाणे सामाजिक कार्यातही रूची होती. थोडक्यात, व्यवहारवादी शिक्षणाकडे या लोकांचा कल होता. अशा या लोकांची जिज्ञासा पूर्ण करण्याचे काम सोफिस्टांनी केले. सोफिस्ट म्हणजे विशिष्ट असे दर्शन नव्हे किंवा तत्वज्ञानही नव्हे, तर हा एक संप्रदाय होय.

तत्कालीन युवकांना राजकीय जीवनात यशस्वी होण्यासाठी विशिष्ट अशा शिक्षणाची गरज होती. जीवनाची उन्नती करून घ्यावयाची असेल तर, त्याचप्रमाणे समृध्द जीवन जगावयाचे असेल तर, केवळ तात्त्विक किंवा प्रारंभिक तत्त्वचिंतकांनी सांगितलेल्या विचारांचा काहीही उपयोग होऊ शकत नाही. याची त्यांना खात्री वाटू लागली. सोफिस्टांनी या युवकांची गरज ओळखली आणि तशा प्रकारचे शिक्षण देण्याचे काम करण्यास सुरूवात केली. सोफिस्टांनी सामाजिक संस्था, नीती, रूढी, परंपरा, धर्म, ईश्वर, शासनसंस्था इत्यादीविषयी आपले स्वतंत्र मत व्यक्त केले व अत्यंत निर्भयपणे व स्पष्ट शब्दात ते व्यक्त करू लागले.

सोफिस्टांनी सार्वभौमिक ज्ञानप्राप्ती संदर्भात, संशय व्यक्त केला आहे. आणि याच कारणामुळे ग्रीस देशात संशयवाद या विचार प्रणालीची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली. १८ व्या शतकात ह्यूम याने सांगितलेल्या तत्त्वज्ञानाची मुळे, कुठेतरी याच विचारात गुंतलेली असल्याचे प्रत्ययास येते. या सर्व विचार प्रक्रियेतून प्रचलित असलेल्या रूढी, परंपरा आणि धर्माविषयी असलेल्या अंधश्रध्दा इत्यादी यांची प्रखरतेने तपासण्याची क्रिया झाली.



थोडक्यात असे म्हणता येईल की, सोफिस्टांनी ज्ञानासंदर्भात संशय व्यक्त केला त्याच बरोबर ज्ञान मिळविणारी व्यक्ती म्हणजेच ज्ञाता यालाही, संशयाच्या पिंजऱ्यात उभे केले. ते पुढे म्हणतात की, ज्ञानप्रक्रियेत ज्ञानाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच ज्ञान व ज्ञाता हे दोन घटकही महत्त्वाचे आहेत. या सर्व विवेचनातून त्यांचेही (सोफिस्टांचे) एक तत्त्वज्ञान उभे राहिले. ते म्हणजे सत्य हे वस्तुनिष्ठ नव्हे. तर सत्य हे नेहमीच व्यक्तीनिष्ठ आहे.

Q.1.0.2 २) पाश्चात्य तत्त्वज्ञानाची मुख्य लक्षणे

पाश्चात्य तत्त्वज्ञानाची प्रामुख्याने ४ वैशिष्ट्ये सांगण्यात येतात त्यांचे स्वरूप पुढील प्रमाणे

१) धर्मशक्तीपासून मुक्त –

प्राचीन काळापासून, राजसत्ता व धर्मसत्ता या दोन्हीला महत्त्व होते. धर्माच्या भोवती कुठेतरी ईश्वर, अंतिम सत्य, अंतिम शक्ती, श्रध्दा, प्रार्थना इत्यादीचे वलय होते. या बरोबरच काही वेळा धर्माच्या अनुषंगाने नकळतपणे अंधश्रध्देचा जन्म होत होता. अर्थात धर्म व अंधश्रध्दा याचा कसलाही संबंध नाही. पाश्चात्य तत्त्वज्ञानात झेनोफेनीस नावाच्या विचारवंताने अनेक देवतावादाचा अस्वीकार केला व एकमेव ईश्वराच्या अस्तित्वाचा स्वीकार केला तो म्हणतो की, "ईश्वर हा नीतीमान व शाश्वत आहे. तसेच देव आणि शिक्षा एकाच आहेत." त्याचे हे विचार म्हणजे धर्मशक्तीपासून एकप्रकारची मुक्तताच होय.

(2) हेरॅक्लिटस या विचारवंताने ईश्वराची पूजा अर्चा करणाऱ्यांवर टीका केल्याचे दिसते. तो म्हणतो की, विश्व हे अखंड बदलत राहणारे आहे. आपल्याला दिसून येणाऱ्या एकतेमध्ये एक प्रकारचा कायदा (नियम) आहे.

(3) डेमॉक्रिटस या विचारवंताने ईश्वराविषयी विचार करताना, असे म्हटले आहे की, पर्जन्य, वादळ, गारपीट इ. घटनेची मनुष्याला भीती वाटत होती. या भयातून मुक्तीसाठी मानवाने ईश्वराची निर्मिती केली.

पाश्चात्य दर्शनात अनेक तत्त्ववेत्यांनी कोणत्याही शक्तीसमोर नमोर न

जाता स्वतंत्र विचार मांडले आहेत. उदा. प्रोटॅगोरस म्हणतो की, खरोखरच देवाचे अस्तित्व आहे किंवा नाही हा एक प्रश्नच आहे. जर तसे अस्तित्व असेल तर ईश्वराचा आकार कसा असेल ? या सारखे प्रश्न उपस्थित करून त्याने संशयवादाची उभारणी केली आहे.

(5) सॉक्रेटीसही असा एक विचारवंत होऊन गेला की, त्याने लोकांवर एक अध्यात्मिक प्रभाव पाडला होता.त्याची अशीही भूमिका होती की जर लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या तर,ते समाजप्रक्रियेत भाग घेऊ शकणार नाहीत. म्हणून प्रथमत: त्यांच्या मताचा आदर केला पाहीजे.

(6) ॲरिस्टॉटल हा विचारवंत म्हणतो की, 'मनुष्य हा विचार करणारा प्राणी' आहे. त्याच्या ठिकाणी विचाराचे सद्‌गुण वास करीत असतात.ॲरिस्टॉटलचा एकंदर निसर्गाविषयीचा दृष्टीकोन हा प्रयोजनवादी आहे.

या सर्व विचारवंतानी सांगितलेल्या विचारावरून असे दिसून येते की,हे सर्व तत्त्वचिंतक कोणत्याही धर्मशक्तीसमोर न झुकता स्वतंत्र विचाराचे आहेत. अशा रीतीने धर्मशक्तीपासून मुक्त अशा प्रकारची विचारप्रणाली पाश्चात्य तत्त्वज्ञानात प्रस्थापित झाल्याचे दिसून येते.

## २) नैसर्गिक स्पष्टीकरण (स्वतंत्र विचारधारा)

पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे 'स्वतंत्र विचारधारा' हेही एक लक्षण सांगता येईल.पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासात, पहिला तत्त्वज्ञ म्हणून थेलीसचा उल्लेख केला जातो.ग्रीक शहरापैकी मायलेट नावाचे शहर अत्यंत श्रीमंत होते तसेच भरभराटीस आलेले होते.याच ठिकाणी थेलिसचा जन्म झाला तो म्हणतो की, सर्व वस्तूंचे आदितत्त्व 'पाणी' हे आहे.त्यानंतर 'ॲनॅक्झिमॅंडर' हा विचारवंत म्हणतो की, या विश्वात परमसत्य अमर्यादित स्वरूपाचे आहेत. सर्व वस्तू येथेच जन्मतात व सर्वांचा लय येथेच होतो.जन्म पावलेली किंवा निर्माण झालेली वस्तू शाश्वत नाही असे ही तो म्हणतो. शेवटी तो ऐवढेच म्हणतो की, 'अमर्याद तत्त्व तेवढेच अनादि व अविनाशी आहे.' त्याच्या या विचारात पदार्थविज्ञानात



सांगितलेल्या 'अविनाशीत्वाचे तत्त्व' दडल्याचे दिसून येते. थेलिस प्रमाणे हा विचारवंत 'पाणी' या द्रव्याला अंतिम सत्य मानत नाही. या दोन तत्त्ववेत्त्यानंतर ॲनॅक्झिमेनीस हा तत्त्वज्ञ होऊन गेला.हा विचारवंतही मायलेटसचा रहिवासी होता. या तत्त्ववेत्त्याने 'हवा' हेच आद्य व अंतिम पदार्थ असल्याचे सांगितले. यानंतरच्या काळातील पायथॅगोरस या विचारवंताने अनेक देवतावादाचे खंडन केले.या विचारवंताने सांगितलेल्या विचाराचाही एक पंथच निर्माण झाला होता. या पंथाने धार्मिक गोष्टींना बाजूला केले व संख्या पध्दतीवर तसेच वैज्ञानिक(शास्त्रीय) दृष्टीकोनावर भर दिला.

पाश्चात्य विचारसरणीत एंपिडॉक्लिस हाही एक वैद्यकीय तज्ञ होऊन गेला. तो शरीरशास्त्राचा अभ्यासक होता. पृथ्वी, आप, तेज, वायु या महाभूतांना त्याची मान्यता होती. तसेच डेमॉक्रॅटीस या विचारवंतांनी असे सांगितले आहे की, हे जग जडद्रव्यअणुपासून तयार झालेले आहे. हा विचारवंत पूर्णपणे जडवादी (Materialist) समजला जातो.

अशा रीतीने या सर्व विचारवंतांनी स्वर्ग, नरक किंवा पारलौकिक अशा बाबींकडे लक्ष न देता तत्त्वज्ञानाचा विचार नैसर्गिक दृष्टीकोनातून केल्याचे दिसून येते. त्याच प्रमाणे सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, रूसो या विचारवंतांनीही काहीशी भर घातल्याचे दिसून येते.

## ३) विज्ञानवादी तत्त्वज्ञान

पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासात, विज्ञानवादी तत्त्वज्ञानाला काहीसे महत्त्व दिल्याचे दिसून येते. ॲरिस्टॉटल या तत्त्ववेत्त्याने द्रव्य आणि आकार हे अंतिम तत्त्व मानले आहे. हे तत्त्व मनुष्यावर किंवा मानवी बुध्दीवर आधारलेले नाही. या ठिकाणीच एक प्रकारचे वैज्ञानिक सत्य दिसून येते. पाश्चात्य तत्त्वज्ञानाला शास्त्रीय म्हणण्याचे अजून एक कारण असे आहे की, येथे नैसर्गिक घटनेचे स्पष्टीकरण, नैसर्गिक आधारावरच करण्याचा प्रयत्न झाला आहे. शास्त्रीयतेचा अर्थच असा आहे की, बुध्दीच्या माध्यमातून स्वतंत्र रीतीने व सुव्यवस्थितपणे

करण्यात येत असलेला ज्ञान प्राप्तीचा प्रयत्न ! पाश्चात्य तत्त्वज्ञानात हा प्रयत्न वेळोवेळी प्रत्ययास येतो.

## ४) बौध्दिक तत्त्वज्ञान

पाश्चात्य तत्त्वज्ञानात बुध्दीला अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते. देकार्त, स्पिनोझा, लाइब्निट्झ हे सर्व विचारवंत बुध्दीवादी होते. या सर्व विचारधारेत जड पदार्थाचे सिध्दांत, गणिताच्या आधारे विशद करण्यात येऊलागले. त्यामुळे नैसर्गिक शास्त्र व गणिताच्या पध्दतीवर (Method of Mathematics) लोकांचा विश्वास वाढू लागला. त्यावेळी अशीही एक विचारधारा निर्माण झाली की, नैसर्गिक शास्त्राचे नियम, हे नैसर्गिकशास्त्रालाच लागू करावेत. ईश्वर, धर्म, नीतीशास्त्र इत्यादींना ते लावले जाउ नयेत. परंतु हा सापत्नभाव, विचारवंताना मानवणारा नव्हता. 'ज्ञान संपादन' हा भाग सर्वांसाठी समान असला पाहिजे. तो बुध्दीला पटला पाहीजे मग ईश्वर असो की पुर्नजन्म असो, आत्म्याचे अस्तित्व असो की नसो, या सर्व बाबीचा उलगडा बुध्दीच्या माध्यमातून केला पाहिजे असे मानणाऱ्या विचारप्रणालीला 'बुध्दीवादी तत्त्वज्ञान' (Rationalism) असे उल्लेखण्यात येउ लागले. म्हणूनच 'बुध्दीवादी तत्त्वज्ञान' हे पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे एक मुख्य वैशिष्ट मानण्यात येते.

Q 130 - 3

## ३) भारतीय तत्त्वज्ञान व पाश्चात्य तत्त्वज्ञान या दोन्हीतील फरक व तुलना

सामान्यपणे असे सांगण्यात येते की, भारतभूमीवरील तत्त्ववेत्यांनी (विचारवंतांनी) सांगितलेले जे विचार आहेत. ते 'भारतीय तत्त्वज्ञान', व युरोपच्या भूमीत व्यक्त झालेले विचार हे 'पाश्चात्य तत्त्वज्ञान' होय. विज्ञानाच्या किंवा व्यापारिक क्षेत्रामध्ये मात्र असा फरक कधीच केला जात नाही. अन्यथा भारतीय विज्ञान व पाश्चिमात्य विज्ञान, भारतीय वाणिज्य व पाश्चात्य वाणिज्य अशा प्रकारचे शब्द रूढ झाले असते, मात्र तसे झाले नाही.



१- पाश्चात्य तत्त्वज्ञानाची सुरूवातच आश्चर्य व जिज्ञासेच्या पोटी निर्माण झालेली आहे. आपल्या जिज्ञासेची तृप्ती करण्यासाठी ते ईश्वर, जग व आत्मा यासंबंधी विचार करण्यास तत्पर झाले. थोडक्यात असे म्हणता येईल की, पाश्चात्य तत्त्वज्ञान ही एक विचारधारा आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञान हे अव्यावहारिक असल्याचे म्हटले जाते तर भारतीय तत्त्वज्ञान कुठेतरी व्यावहारिक असल्याचे प्रतिबिंबीत होते. भारतामध्ये तत्त्वज्ञानाची सुरुवात कुठेतरी मानवी जीवनातील दु:खाशी संबोधित आहे. या ठिकाणच्या तत्त्ववेत्त्यांनी प्रथमतः दु:खाचे अस्तित्व मान्य केले. या जगातील दु:खे नजरेने पाहिली. ही सर्व दु:खे पाहून ते कुठेतरी व्याकूळ झाले आणि यातूनच तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झाले. महात्मा गौतम बुध्द, महावीर अशी उदाहरणदाखल म्हणून अशी कितीतरी नावे सांगता येतील. या संदर्भाला अनुसरूनच प्रा. मॅक्समुलर सारख्या अभ्यासकांनी, भारतातील तत्त्वज्ञानाचा अभ्यास फक्त ज्ञानप्राप्तीसाठी केला जात नसून जीवनातील अंतिम सत्य प्राप्तीकरिता केला जात असल्याची भूमिका ते घेतात.

२- पाश्चात्य तत्त्वज्ञानाला 'वैज्ञानिक तत्त्वज्ञान' असेही म्हटले जाते त्याचे कारण एवढेच आहे की, त्या ठिकाणच्या कित्येक तत्त्ववेत्त्यांनी वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केल्याचे दिसते. उदा. मिल्ल, व्हेवेल, बेकन अशी काही प्रातिनिधिक उदाहरण म्हणून देता येईल.

पाश्चात्य तत्त्वज्ञानात प्रामुख्याने विज्ञानाचा स्वीकार केल्यामुळे, तत्त्वज्ञान व धर्म यातील संबंध काहीसे विरोधात्मक असल्याचे मानले जाते. वास्तविक पाहता सर्वधर्म व्यावहारिक आहेत. म्हणूनच पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे एकंदर स्वरूप पाहात असताना आपल्या ध्यानात येते की, भारतीय तत्त्वज्ञानात ज्याप्रमाणे धर्माला स्थान आहे, तसे स्थान येथे नाही. एवढेच नव्हे तर त्या ठिकाणी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात धर्माची उपेक्षाच झाल्याची दिसते.

भारतामध्ये असे चित्र दिसून येते की, भारतीय तत्त्वज्ञानाचा दृष्टिकोन हा कुठेतरी धार्मिक आहे. कारण ह्या दोन्ही शास्त्रांचा उद्देश व्यावहारिक आहे. तत्त्वज्ञान व धर्म या दोन्हींचे ध्येय हे एकच आहे. हे ध्येय कोणते आहे ? असा प्रश्न कोणी

केल्यास 'मोक्ष प्राप्ती' हेच एकमेव ध्येय आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानामध्ये मात्र असा या मोक्ष प्राप्तीला स्थान नसल्याचे दिसून येते.

पाश्चात्य तत्त्वज्ञान हे बौध्दिक स्वरूपाचे आहे, तर भारतीय तत्त्वज्ञान हे शब्दप्रमाणावर आधारीत, तसेच श्रध्देवर आधारित असल्याचे म्हटले जाते. या संदर्भात पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांची भूमिका अशी आहे की, बुध्दीच्या माध्यमातून वास्तविक ज्ञान व सत्य ज्ञानाची प्राप्ती होऊ शकते. बुध्दीने प्राप्त झालेले ज्ञान म्हणजे सत्य ज्ञान अशी त्यांची भूमिका आहे. बुध्दीच्या माध्यमातून प्राप्त झालेले ज्ञान हे परोक्षज्ञान होय. बुध्दीला महत्त्व देणाऱ्या तत्त्ववेत्त्यामध्ये सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, देकार्त, स्पिनोझा, लाइब्निट्झ इ. तत्त्ववेत्ते होत. प्राचीन काळातील डेमॉक्रिटस या तत्त्ववेत्त्यानेही बुध्दीला महत्त्व दिल्याचे दिसते.

पाश्चात्य तत्त्वज्ञान हे वैज्ञानिक स्वरूपाचे असल्यामुळे, त्याला इहलोकाचे अस्तित्व मान्य आहे. भारतीय तत्त्वज्ञान मात्र इहलोकाबरोबरच परलोक, स्वर्ग, इ. बाबींवर विश्वास ठेवते.

पाश्चात्य तत्त्वज्ञानात, या जगाशिवाय अन्य कोणतेही जग अस्तित्वात नाही असे सांगण्यात आले आहे. या उलट भारतीय तत्त्वज्ञानामध्ये मात्र, स्वर्ग व नरक या विषयीची मीमांसा करण्यात येते. चार्वाकाला सोडून सर्वच तत्त्ववेत्त्यांनी या विचाराला मान्यता दिली आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा दृष्टिकोन हा जीव आणि विश्वाच्या संदर्भात दुःखात्मक स्वरूपाचा आहे. मात्र पाश्चात्य तत्त्वज्ञान हे 'जीव आणि जग' या बाबतीत आशावादी आहे.

या एकंदर विचार करता असे म्हणता येईल की, भारतीय तत्त्वज्ञान हे इतिहासाचा एक भाग आहे. म्हणूनच या विषयात असणारी विविध मते समजावून घेण्यात प्रत्यवाय नसावा. मात्र त्याला विशिष्ट असा वर्तमान किंवा भविष्यकाळ आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. भारतीय तत्त्वज्ञानाचा आद्य जनक कोण ? या प्रश्नाचेही नीट उत्तर देता येत नाही. पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मात्र असे म्हणावे लागेल की त्यात कोठेतरी निश्चित अशी वाटचाल झाली आहे. ग्रीकांच्या काळापासून ते आजच्या शतकापर्यंत पाश्चात्य तत्त्वज्ञान अखंड परंपरा



वाटेवरून जाताना दिसते. अर्थात प्राचीन तत्त्ववेत्यांनी जी दर्शनांच्या वाटा, जलीकडच्या तत्त्ववेत्त्यांनी बदललेल्या आहेत. असे मात्र म्हणता येत नाही. त्यांच्या विचारमंथनामध्ये भरपूर बदल झाल्याचे दिसून येते. उदा. 'दुसरे महायुध्द' ही एक दुःखद घटना होती. त्या निराशेतून अस्तित्ववादी दर्शनाची उत्पत्ती झाली, पारंपारिक तर्कशास्त्राच्या मर्यादा ध्यानात आल्यामुळे यावर मूलगामी असे चिंतन झाले. त्यातूनच प्रतीकात्मक तर्कशास्त्राचा (Symbolic Logic) जन्म झाला. तसेच या भूमिमध्ये (पाश्चात्य भूमी) भाषिक विश्लेषण ही उदयास आले. भारतीय तत्त्वज्ञान मात्र परिपूर्ण असल्याचे व त्यात कोणताही सुधारणा घडवून आणण्याची गरज नाही अशी भूमिका काही विचारवंत घेताता.

पाश्चात्य तत्त्वज्ञान हे धर्मापासून वेगळे आहे. भारतीय तत्त्वज्ञान मात्र कुठेतरी धर्माशी संबंधित असल्याचे जाणवते. पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांनी एखाद्या मतावर टीका केली असेल तर, तो अधार्मिक ठरत नाही. भारतामध्ये मात्र अनेक साधु, संत, पुराणिक, कीर्तनकार, प्रवचनकार अस्तित्वात आहेत. त्याचप्रमाणे काही धर्मसंस्थेचेही प्राबल्य आहे. या सर्वांनी तत्त्वज्ञानावर एक प्रकारे आक्रमणच केल्याचे दिसते. हे सर्व लोक भारतीय तत्त्वज्ञानावर जणू काही अधिकारवाणीने बोलतात. खरे म्हणजे बौध्द, जैन, चार्वाक व अन्य काही तत्त्वज्ञानात त्यांचे स्वतःचे तर्कशास्त्र, ज्ञानमीमांसा, कार्यकारणभाव इत्यादी विषयाचे ज्ञान आहे. या भागावर मात्र हे लोक मौन धारण करतात किंवा त्यावर कधीच भाष्य करीत नाहीत.

भारतामध्ये असेही एक चित्र दिसून येते की, जो मनुष्य ज्या धर्माचा आहे त्या मनुष्याला त्या त्या धर्माचे प्राथमिक ज्ञान नसले तरी, त्या धर्मावर श्रध्दा ठेवावी लागते. काहीवेळा असे दिसून येते की, त्या त्या धर्मविधीमध्ये, तत्त्वज्ञानाचे धडे शिकविले जातात. मात्र त्यांच्या हे लक्षात येत नाही की, तत्त्वज्ञानातील समस्या या शास्त्रीय आहेत. त्यात धर्माचा प्रवेश होऊ शकत नाही. परंतु बहुतेकांना असे वाटते की, आमचेच तत्त्वज्ञान हे श्रेष्ठ आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानामध्ये जशी शास्त्रीयता आली आहे तशी शास्त्रीयता भारतीय तत्त्वज्ञानामध्ये येऊ शकली नाही. या सर्व बाबींचे मूळ वरील भागात प्रतिबिंबित होते.

०००

सॉक्रेटिसांची संवादपद्धती / उपहास पद्धतीची वैशिष्ट्ये :-

सॉक्रेटीस हा एक सुप्रसिद्ध ग्रीक तत्वज्ञानी होता. त्याने व त्याच्या प्लेटो, ॲरिस्टॉटल या शिष्यांनी तात्विक विचारात अत्यंत मोलाची भर टाकली आहे. सॉक्रेटिसचा जन्म इ.स.पूर्व 469/470 मध्ये ग्रीकमधील अथेन्स येथे झाला. त्याच्याबरोबर त्याचे मृत्यूसमय वय 70 वर्षांचा असल्यामुळे. तो मरेपर्यंत 70 वर्ष जगला म्हणून त्याचे जन्मवर्ष इ.स. पूर्व 469/470 हे गृहीत धरले आहे. सॉक्रेटिसचे तत्वज्ञान त्याचा शिष्य प्लेटो Apology नामक संवादातून पहावयास मिळेल. त्याचा मृत्यू इ.स. पूर्व 399 मध्ये झाला. सॉक्रेटिसच्या वडिलांचे नाव सफ्रोनिस्कस असून त्याचा व्यवसाय मूर्तिकाराचा होता. आईचे नाव फेनारेटी असून ती व्यवसायाने दाई होती. आईवडिलांच्या या व्यवसायाचा प्रभाव त्यावर पडल्यामुळे साहजिकच तो या व्यवसायाकडे ओढला गेला. सुरुवातीला व्यवसायात तो वडिलांना मदत करत असे. पण त्याचे या व्यवसायात मन लागत नसे. तो कुशाग्र बुद्धीचा असल्यामुळे तो व्यवहार निपुण होता. सॉक्रेटिसजवळ असामान्य अशी प्रज्ञा होती तो अत्यंत संवेदनशील होता. सॉक्रेटिसांनी काही स्वतःच्या विचारांची नोंद करून ठेवली नाही. त्याने जे काही तत्वज्ञान सांगितले त्याला शब्दरूप देण्याचे काम त्याच्या शिष्यांनी म्हणजेच प्लेटोने पूर्ण केले.

त्याचे विचार व विचारपद्धती ही तत्काल विचारवंत सोफिस्टांपेक्षा वेगळी होती. कोणत्याही विचाराची किंवा गोष्टीची चिकित्सा केली पाहिजे, समीक्षा केली पाहिजे यावर त्याचा भर होता. प्रोटेगोरस सोफिस्टने ज्ञानाकडे व्यक्तीनिष्ठ भूमिकेतून पाहिले. त्यांनी ज्ञान हे व्यक्तीनिष्ठ असते म्हणजे व्यक्तीच्या सतत बदलणाऱ्या मतास ज्ञान म्हणतात. त्यामुळे ज्ञान या विचारास विसंवाद निर्माण झाला होता. या विसंवादामुळे समाजात गोंधळ गडबड निर्माण झाली होती. त्यांनी सोफिस्टांची दांभिकता व त्यांचे विरोधवादी विचार समाजासमोर निर्भिडपणे मांडली. त्यांच्या या तमाला मूळ विचारातील विसंवाद व गोंधळाची अवस्था दिसून येते. या विचारांच्या माध्यमातून सॉक्रेटिसने समाजात स्वतःचे स्थान निर्माण केले. म्हणूनच त्यास म्हटले जाते की सॉक्रेटिसने सोफिस्टच्या संशयवादी व शून्यवादी विचार प्रणालीपासून समाजाला वाचविले. समाजाला विधायक पायावर विचार शिकविण्याचे मोलाचे कार्य सॉक्रेटिसने केले. सॉक्रेटिस हा जगावेगळा तत्ववेत्ता होता. सॉक्रेटिस हा जगविख्यात तत्ववेत्ता असला तरी अन्य तत्ववेत्त्याप्रमाणे आपले तात्विक विचार लिखित स्वरूपात मांडले नाहीत. सॉक्रेटिस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकत सुमती करत असे. तो सतत लोकांशी बोलत असे तो सतत बोलत असल्यामुळे अंतर्मनाचा शोध घेऊन त्याविषयी पाहे.

विचार मांडले. पुढे त्यांनी संवाद-पद्धतीच्या सहाय्याने आपले विचार लोकांना पटवून देत असे व या संवादाच्या मार्फत लोकांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्नही करत असे कारण. अन्य तत्ववेत्त्यांपेक्षा त्यांचा हेतू वेगळा होता. बहुसंख्य तत्ववेत्त्यांचा हेतू आपल्या विचारांच्या माध्यमातून इतरांवर प्रभाव टाकण्याचा असतो. इतरांनी आपले अनुयायी व्हावे अशी त्यांची अपेक्षा असते. या तत्ववेत्त्यांच्या मांडणीतूनच अनेक विचारप्रणाली अस्तित्वात येतात. पण सॉक्रेटिसची मानसिक अपेक्षा वेगळी होती. सॉ. लोकांना आपले अनुयायी बनवू इच्छित नव्हता. आपल्यानंतर आपले अनुयायी किंवा संप्रदाय असावा अशी त्यांची आकांक्षा नव्हती. याउलट सॉ.चा मुख्य हेतू लोकांना ज्ञान देणे हा होता. त्यांनी लोकांच्या मनात ज्ञानाविषयी प्रेम आस्था निर्माण करण्याचे कार्य केले. तो लोकांनी स्वतंत्र विचार करण्यास शिकावे, लोकांना विचारी बनवावे अशी त्याची इच्छा होती. यामुळे तो सतत लोकांना आग्रहपूर्वक असे प्रतिपादन करीत असे की प्रत्येक व्यक्तीने जीवनातील समस्येवर स्वतः विचार केला पाहिजे. याबरोबरच सॉ. लोकांना विचार करण्याची कला व निष्कर्षापर्यंत जाण्याचा मार्ग शिकवत असे. यासाठी त्याने आत्मप्रबोधन पद्धतीचा वापर केला. त्याचपद्धतीचा लोकांनी वापर करावा असे आग्रहाने सांगत असे.

## सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती :-

तत्वज्ञानामध्ये सॉ.च्या पद्धतीला फार महत्वाचे स्थान आहे. कोणताही तत्ववेत्ता आपले तात्विक विचार मांडण्यासाठी विशिष्ट पद्धतीचा अवलंब करत असतो सॉ.ने देखील आपले विचार मांडण्यासाठी विशेष पद्धतीचा वापर केलेला आहे. या सॉ.च्या पद्धतीला संवादपद्धती/चर्चापद्धती द्वंद्वात्मक पद्धती/वादविवाद पद्धती असेही म्हणतात. सॉ.च्या मते तत्वज्ञानाचे अंतिम प्रयोजन सत्याचा शोध घेणे आहे. तत्वज्ञानाचा हेतू ज्ञान प्राप्त करून घेणे हा आहे. सत्याचा शोध घेण्यासाठी व ज्ञान संपादनासाठी सॉ.ने संवाद पद्धतीचा अवलंब केला आहे.

सॉ. ने वापरलेल्या संवाद पद्धती/द्वंद्वात्मक पद्धती या संबंधी त्यांने कोठेही लिहून ठेवलेले नाही परंतु तो लोकांशी संवाद साधताना लोकांशी बोलताना या पद्धतीचा वापर करायचा या संवाद पद्धतीचा वापर सॉक्रेटिसने केला असला तरी या पद्धतीचे जनक तो नसून झिनो आहे. सॉ. रस्त्यात उभा राहत असे रस्त्यात भेटेल त्याच्याशी तो चर्चा करीत असे. दुसऱ्याशी चर्चा करताना तो त्यांना सामान्य माणसाच्या जीवनातील दैनंदिन प्रश्न आणि घटना याविषयी चर्चा करीत असे. त्यांच्या प्रश्नासंबंधी, अडचणीविषयी तो त्यांना प्रश्न विचारीत असे आणि त्यांची उत्तरे लक्षपूर्वक ऐकत असे आणि त्या उत्तरातून नवीन प्रश्न विचारत असे. या प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून तो प्रश्नांच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रय-

उत्तर मेळून होत. शाळांना स्वतःच्या विचाराने नंतर त्यात राहावे असे. या पद्धतीला संभाषण पद्धती म्हणता येईल. या संवादाच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केला जात असे. प्रश्नाच्या मुळापर्यंत जाता येईल अशी प्रश्नोत्तरांची मालिका तयार केली जात असे व त्यातून शेवटी अंतिम निष्कर्ष काढला जात असे. म्हणूनच तत्त्वज्ञानात सॉ.चे महत्त्वाचे स्थान आहे.

सॉ.नी वापरलेली संवादपद्धती / द्वंद्वात्मक पद्धतीचा मुख्य हेतू वेगवेगळ्या प्रश्नासंबंधी असलेल्या संकल्पना शब्द यांचा अर्थ निश्चित करणे हा होता. यामुळे तो संवाद प्रक्रियेच्या माध्यमातून वेगवेगळ्या कल्पनांच्या संज्ञांच्या व्याख्या स्पष्ट करीत असे. या शब्दांच्या किंवा व्याख्यांच्या स्पष्टीकरणासाठी तो दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत असे. अशा पद्धतीला द्वंद्वात्मक पद्धती असे सॉ. म्हणत. या प्रक्रियेच्या सहाय्याने तो लोकांना अर्थ पटवून देत असे.

सॉ.ची द्वंद्वात्मक पद्धती वापरताना लोकसंपर्क साधला. परंतु अनेकदा तो लोकसंवादात एखाद्या प्रश्नासंबंधी तो लोकांच्यासमोर नकारात्मक भूमिका घेत असे. चुकीचा विचार किंवा पक्ष हा खरा पक्ष आहे. अशी भूमिका घेऊन तो विचार मांडत असे. यामुळे लोक त्याच्या या चुकीच्या भूमिकेविषयी विरोध करीत असत. विरोध करण्यासाठी लोक युक्तिवाद मांडत आणि युक्तिवादाच्या आधारे त्यांनी मांडलेल्या विचारांच्या आधारे लोकांचे मत तो स्वीकारत असे. या तंत्रीचा अवलंब करण्याचा त्यांचा हेतू हा होता की, त्यांनी ज्या लोकांशी चर्चा करीत त्यांनी स्वतः विचार करावा स्वतंत्रपणे सत्याचा शोध घ्यावा ही त्यांची अपेक्षा होती. त्यामुळे तो संवादात प्रथमतः नकाराची भूमिका घेत असे. सॉ.ने या पद्धतीसंबंधी कोठेही लिहून ठेवले नाही व त्याचे विश्लेषणही केलेले नाही. आपण ही पद्धती वापरत आहोत याचीही जाणीव त्याला नव्हती. तथा या पद्धतीचे खालील प्रमुख वैशिष्ट्य सांगता येईल.

1. संवादपद्धती ही संशयात्मक पद्धती आहे.
2. संवादपद्धती ही विगमनात्मक व अनुभवात्मक स्वरूपाची आहे.
3. संवादपद्धती ही वादविवाद स्वरूपाची आहे.
4. " ही संकल्पनात्मक व व्याख्यात्मक आहे.
5. " ही निगमनात्मक स्वरूपाची आहे.

* सॉक्रेटिसांची संवादपद्धतीचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे ही पद्धती संशयात्मक स्वरूपाची आहे.

सॉ. तात्त्विक प्रश्नांचे विश्लेषण करताना किंवा मांडणी करताना त्या प्रश्नासंबंधी प्रथमतः तो संशय प्रगट करत असे. उपस्थित केलेल्या प्रश्नाविषयीचे ज्ञान त्याच्याकडे असले तरी ते तो लपून ठेवत असे. एवढेच नव्हे तर त्याच्याशी निगडीत असलेल्या तथ्याविषयी शंका किंवा संशय व्यक्त करीत असे. सॉ.ची ही संशयपद्धती बुद्धिवादी तत्त्ववेत्ता डेकार्टच्या संशय-पद्धतीपेक्षा वेगळी होती. आहे. सॉ.च्या या संशय-घेण्याच्या पद्धतीवर काहींनी टिकाही केले आहे. टिकाकार असे प्रतिपादन करतात की सॉ.नी त्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे माहीत होती. स्वतः ज्ञानी

अजुन अज्ञानी होतो आहोत अशी भूमिका घेणे योग्य नाही. म्हणून सॉ.च्या या कृत्रिम संशय-पद्धतीला। सॉ. कोंग असे म्हटलेले आहे. परंतु या टिकेमध्ये काही तथ्य आढळून येत नाही. सॉ. स्वत: ज्ञानी असून सुद्धा तो लोकांकडून सर्व विचार काढून घेत असे. त्याचे हे अज्ञान लौकिक विनयशीलतेचे द्योतक होते. सॉ.च्या उद्देश आपल्या विचाराने लोकांना प्रभावित करणे हा नव्हता. तो स्वत:ला सामान्य व्यक्ती समजत असे. कोणत्याही प्रश्नाची सुरुवात तो अत्यंत विनम्रपणे करीत असे. त्यामुळे आपण ज्ञानी असून अज्ञानी भासवणे हे चुकीचे आहे. अशी त्यावर टिका निरर्थक ठरते.

सॉ. प्रमाणे तात्कालीन विचारवंत सोफिस्ट यांची पद्धतीदेखील संशयात्मक होती. परंतु सॉ. आणि सोफिस्ट यांच्या संशय पद्धतीत फरक आहे. सोफिस्टांची संशयपद्धती ही व्यावहारिक स्वरूपाची होती. त्यांची संशयापासून कधीही सुटका झालेली नाही. तर उलट सॉ.चा संशय हा प्रारंभीक स्वरूपाचा होता. सत्यज्ञान शोधण्याच्या हेतूने संशय व्यक्त केला जात असे. म्हणून संशय हा सत्य शोधण्याचे साधन म्हणून सॉ.ने संशयाला मानले आहे. सॉ.च्या मते संशय हा साध्य नव्हता. सॉ.चा संशय हा निश्चीततेकडे जाणारा होता. सॉ. संशयाच्या साधनाने सत्यज्ञान संपादन करणे हे उद्दीष्ट पुर्ण करण्यास धडपडत होते.

* सॉक्रेटिसची संशयपद्धती अनुभवात्मक व विकासनात्मक स्वरूपाचे आहे:

सॉ.ने आपले विचार अनुभवाच्या भाषेतून मांडले आहे. सॉ. लोकांशी विविध विषयावर बोलत असे आणि ते विषय किंवा प्रश्न त्यांच्या दैनंदीन जीवनातील असत. कोणत्याही संकल्पनेची किंवा संज्ञेची रचना करताना सॉक्रेटिस संवादातील या दैनंदीन अनुभवाला नकलीत करत असे. या घेतलेल्या अनुभवातून जे विशिष्ट गुण पाहीले जातात, त्या विशिष्ट गुणावरून शेवटी तो सामान्य संकल्पना तयार करीत असे. यावरून हे स्पष्ट होते की, सॉ. दैनंदीन जीवनात वापरल्या जाणाऱ्या संकल्पना तयार करताना अनुभवाचा आधार घेत असे. त्यामुळे त्याची पद्धती ही अनुभवात्मक स्वरूपाची आहे.

* सॉक्रेटिसची संवादपद्धतीही वादविवादात्मक स्वरूपाची आहे:

सॉ.ची संवादपद्धती संभाषणात्मक स्वरूपाची आहे. सॉ.च्या मते विचार करणे हे एक प्रकारचे आंतरीक संभाषणच असते. या आंतरीक संभाषणातूनच विचारांचा विकास होत असतो. सॉ. आग्रहपूर्वक असे प्रतिपादन करतो की, प्रत्येक व्यक्तीने कोणतीही गोष्ट जशीच्या तशी स्वीकारता कामा नये. प्रत्येक विचाराचे किंवा गोष्टीचे परीक्षण केले पाहिजे व तपासलेले जीवन हे परिपुर्ण जीवन असते, अशी त्यांची धारणा होती. सॉ. सर्व विचारांची चिकीत्सा करून व्यक्तीने विचार स्वीकारले पाहिजे असे म्हणतो.

तरूणात व सामान्य माणसामध्ये ही चिकित्सक वृत्ती वाढावी म्हणून तो त्यांच्याशी संवाद करीत असे. या संभाषण पद्धतीच्या सहाय्याने तो आपले तात्त्विक विचार मांडत असे. सॉ.चा कोणताही वाद हा उद्देशरहित नव्हता त्याचे कोणतेही संभाषण निरर्थक नव्हते. त्यांचे सॉ.द्वारे केल्या गेलेल्या संवादात सत्याचा शोध होणे सार्वभौम ज्ञान प्राप्त करणे त्याचा हेतू असे. वादविवादाच्या माध्यमातून सॉ. सत्याच्या संदर्भात जे निर्माण झालेले भ्रम आहे. ते दूर करण्याचा तो प्रयत्न करीत असे. संवादाच्या माध्यमातून सॉ. स्वतः प्रश्न उपस्थित करीत असे व त्या प्रश्नासंबंधी लोकांना विचार करण्यास प्रेरित करीत असे. त्यामुळे त्या समस्ये संबंधीचे वेगवेगळे पैलू समोर येत असत व त्याच पैलूच्या सहाय्याने तो निष्कर्षापर्यंत पोहचत असे. म्हणून सॉ.च्या पद्धतीमध्ये वादविवादाला फार महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते.

5) **सॉक्रेटिसची पद्धती ही संकल्पनात्मक व व्याख्यात्मक स्वरूपाची आहे :—**

सॉ.च्या संवादपद्धतीचे हे एक अतिशय महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. सॉ.ने दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या असंख्य महत्त्वाच्या संकल्पनांचा व शब्दांचा अर्थ निश्चित करण्याचा प्रयत्न केला. अनेक संकल्पनांच्या व्याख्या स्पष्ट करण्याचा व व्याख्या तयार करण्याचा प्रयत्न सॉ.ने केला. शब्दाचा वा संकल्पनाचा अर्थ माहीत असेल तर समस्या सोडवणे सोपे जाते अशी त्याची धारणा होती. म्हणून त्याच्या तत्त्वचिंतनात संकल्पनांची व्याख्या करणे या प्रक्रियेला फार महत्त्व आहे. सॉ. कोणत्याही घटनेचे किंवा समस्येचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी त्यासंबंधी प्रथमतः तो संकल्पनाचा अर्थ निश्चित करीत असे. यामुळेच सॉ.ने आपल्या संवादातून न्याय म्हणजे काय? ज्ञान, साहस, नैतिकता, बुद्धिमत्ता तसेच सद्गुण म्हणजे काय? आदी प्रश्नांची चर्चा केली आहे. चर्चा करून त्याने न्याय, ज्ञान, साहस, बुद्धिमत्ता, आदी संकल्पनांचा अर्थ स्पष्ट केला आहे. म्हणूनच त्याच्या संवादपद्धतीचे स्वरूप हे संकल्पनात्मक आहे असे म्हटले जाते. सॉ.च्या पूर्वी सोफिस्टांनी शब्द किंवा संज्ञाच्या अर्थात बराच गोंधळ निर्माण केलेला होता. या शब्दाच्या अर्थातील असंदिग्धता आणि अस्पष्टता दूर करण्याचा प्रयत्न सॉक्रेटिसने केला होता. कारण सॉ.ची अशी धारणा होती की, संकल्पनाचा अर्थ स्पष्ट असेल तर मानवी प्रश्न सोडवणे सतत सुलभ होते. यामुळेच त्याने प्रत्येकाच्या व्याख्या करण्यावर व अर्थ स्पष्टीकरणावर अधिक भर दिला आहे.

**सॉक्रेटिसची पद्धती ही निगमनात्मक स्वरूपाची आहे :—**

सॉ.च्या अभ्यासपद्धतीचे स्वरूप जसे विगमनात्मक व अनुभवात्मक आहे तसेच निगमनात्मकही आहे. सत्य शोधण्याचा विगमन आणि अनुभव यावर अवलंबून राहता येत नाही. विगमनाबरोबर निगमन प्रक्रियेचा वापर करून तो सत्य शोधण्याचा नेहमीच प्रयत्न करतो. यामुळेच त्याच्या विचारात विगमन तर्कपद्धतीप्रमाणेच निगमन तर्कपद्धतीला महत्त्व आलेले दिसून येते. सॉ.ची अशी धारणा होती की, सत्य प्रस्थापित करण्यासाठी विगमन व निगमन या दोघांची आवश्यकता असते. यामुळेच त्याची संवादपद्धती ही निगमनात्मक स्वरूपाची आहे. यावरून हे स्पष्ट होते की सॉ.ची द्वंद्वात्मक किंवा संवादात्मक अभ्यास पद्धती अतिशय महत्त्वाची आहे.

## सॉक्रेटिसचा नैतिक सिद्धांत स्पष्ट करा :-

सुप्रसिद्ध ग्रीक तत्वज्ञ सॉक्रेटिस यांचे नैतिक विचार अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक आहेत. पाश्चात्य नीतीविचाराचा प्रारंभ सॉक्रेटिसच्या नैतिक विचारापासून झाला आहे. यामुळे पाश्चात्य तत्वज्ञानात सॉक्रे नीतीविषयक विचाराला महत्वाचे स्थान आहे. सॉक्रेटिस, प्लेटो व ॲरिस्टॉटल या सॉक्रेटिसच्या दोन शिष्यांनी नैतिक विचारात मोलाचे भर टाकले आहे. सॉक्रेटिसने केवळ नैतिक विचार मांडलेले नाहीत तर मांडलेले नैतिक विचार स्वजीवनात, आचरणात आणले. यामुळे त्याचे व्यक्तीमत्व हे प्रभावी ठरलेले आहे. विविध सद्गुणांचा आविष्कार म्हणजे नैतिकता होय. सद्गुणांच्या आधारेच नीतीचा उद्रेक होत असतो. सॉक्रेटिसने नीतीविषयक आपले विचार प्रत्यक्ष आपल्या जीवनात उतरविलेले होते. ज्ञान, धैर्य, संयम, बुद्धी आणि न्याय हे मौलिक सद्गुण सॉक्रेटिसच्या आचरणातून प्रगट झालेले दिसतात. या अर्थाने तो नैतिक मूल्य आचरणात आणणारा महान तत्ववेत्ता होता.

सॉक्रेटिसच्या नीतीविषयक विचाराचे स्वरूपाने सार असे सांगता येईल की. सॉक्रेटिसच्या मते, व्यक्तीला सत्याचे ज्ञान होणे आवश्यक आहे. सत्याचे ज्ञान झाले की व्यक्तीमध्ये सत्याविषयी सत्यनिष्ठा विकसीत झाली पाहिजे आणि केवळ सत्यनिष्ठेप्रमाणे व्यक्तीने आपल्या जीवनात आचरण केले पाहिजे. सत्यज्ञान आणि सत्यनिष्ठा यानुसार आचरण हे सॉक्रेटिसच्या नैतिक विचाराचे सार आहे.

### ज्ञानाचा नीतीला आधार :-

सॉक्रेटिसने जीवनाच्या सर्व क्षेत्रात ज्ञानाला अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. त्याच्या मतानुसार जीवनातील प्रत्येक क्रिया ही उचित ज्ञानावर आधारलेली असली पाहिजे. यामुळे सॉक्रेटिस म्हणतो → जीवनात ज्ञान उपयुक्त व आवश्यक आहे. सॉक्रेटिस ज्ञानाकडे केवळ तात्विक वा ग्रंथातील दृष्टिकोनातून पाहत नाही. ज्ञानाचा दैनंदिन व्यवहाराशी संबंध जोडला पाहिजे असा त्याचा आग्रह होता ही त्याची ज्ञानविषयक भूमिका नितीशास्त्रात स्पष्ट झालेली दिसते. त्याचे नैतिक विचार हे ज्ञानावर आधारलेले आहेत. म्हणून सॉ. ज्ञाना स्वतः ज्ञान हा नैतिक विचाराचा आधार असला पाहिजे असे म्हणतो.

### व्यक्तीला सद्गुणी बनविणे - नीतीचे प्रयोजन :-

सॉक्रेटिसने नैतिक विचार आणि प्रत्यक्ष मानवी जीवनव्यवहाराचा संबंध प्रस्थापित केला आहे. नीतिविषयक सिद्धांत हा ग्रंथ व्यवहारात कसा उतरविणे आवश्यक आहे असे त्याचे विचार होते. यामुळे सा. ने नीतीमिमांसेत तत्वचर्चा व्यवहाराला अधिक महत्व दिले आहे. तो ज्ञानासाठी ज्ञान म्हणून ज्ञानाकडे पाहत नव्हता तर त्या ज्ञानाचे रुपांतर सद्गुणात झाले पाहिजे असा त्याचा आग्रह होता. सॉ. ने सद्गुण म्हणजे काय ? या प्रश्नाचा विचार केला व सद्गुणाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. हे त्याचे नीतिशास्त्रातील महत्वाचे योगदान आहे. परंतु असे असले तरीही सद्गुणाची व्याख्या करणे हा केवळ त्याचा हेतू नव्हता

हेतू नव्हता तर त्या आत्मोन्नुरूप स्वतः सद्गुणी बनणे व इतरांना सद्गुणी बनवणे हा त्याचा हेतू होता. यामुळे तो नितीच्या माध्यमातून स्वतः व इतरांना सद्गुणी बनवू इच्छित होता. यावरून हे स्पष्ट होते की सॉक्रेटीसचे नितिविषयक विचार मानवी जीवनाशी निगडीत आहेत.

**ज्ञान परम शुभ आहे :-**

सॉ. ने ज्ञानाला महत्व दिलेले दिसून येते. युवकांना नव्हे तर सॉ. म्हणतो नीतिशास्त्राचे अंतिम उद्दिष्ट किंवा परम शुभ हे ज्ञान [illegible] असतात असे [illegible] लक्षणाचे म्हणजे आहे मानवी जीवनात परम शुभ कोणते असते हा नितिशास्त्रातील मुख्य प्रश्न आहे [illegible] उत्तर [illegible] सॉ. म्हणतो मानवी जीवनाचे परमशुभ म्हणजे ज्ञान [illegible] हे जसे परमशुभ आहे [illegible] सद्गुण [illegible] असे सॉक्रेटीस प्रतिपादन करतो [illegible]

समाजातील सर्वच व्यक्ती सद्गुणी होऊ इच्छितात. कोणत्याही व्यक्तीला सद्गुणी होण्यासाठी त्याला शुद्ध ज्ञानाची आवश्यकता असते. सत्य व शुद्ध ज्ञानाशिवाय कोणालाही सद्गुणी होता येत नाही. जोपर्यंत आपले हित कशात आहे हे समजत नाही तोपर्यंत व्यक्तीचे आचरण सद्गुणी होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे शिल्पकाराला

सुंदर शिल्प कोरण्यासाठी शिल्पकलेचे ज्ञान आवश्यक असते त्याचप्रमाणे चांगला माणूस व सद्गुणी व्यक्ती होण्यासाठी सद्गुणांच्या ज्ञानाची गरज असते. सद्गुणांच्या ज्ञानाशिवाय व्यक्तीला सद्गुणी होता येत नाही. सॉ. च्या मते सद्गुणाचे ज्ञान प्राप्त झाले म्हणजे सद्गुणी होणे हेच त्याचे ध्येय. सॉ. च्या मते ज्ञान व ज्ञानाची क्रिया यामध्ये अंतर असत नाही. यामुळे तो म्हणतो ज्ञान हेच सद्गुण आहे.

ज्ञान म्हणजे सद्गुण हे सॉक्रेटीसचे विधान जगप्रसिद्ध आहे. या विधानाची प्रस्थापना त्याने [illegible] पद्धतीने केली आहे. तो म्हणतो प्रत्येक व्यक्तीला आनंद हवा असतो. हा आनंद शुभ क्रिया द्वारे मिळत असतो. शुभ क्रिया करण्यासाठी शुभ किंवा चांगल्याचे ज्ञान आवश्यक असते. शुभाचे ज्ञान असल्याशिवाय शुभ क्रिया करता येत नाही याचा अर्थ असा आहे शुभ क्रियेचे मूळ ज्ञान आहे म्हणून ज्ञान हाच सद्गुण आहे.

**ज्ञानाविषयक इतरांचे महत्व :-**

[illegible] विचारात ज्ञानाला सर्वोच्च स्थान दिलेले आहे परंतु त्याचबरोबर नैतिक विचारात [illegible] देखील महत्व दिलेले आहे. कारण सॉक्रेटीसच्या [illegible] देखील ज्ञानावर आधारित असते. कोणतीही व्यक्ती स्वइच्छेने वाईट [illegible] करत नाही. जर वाईट गोष्टीचे ज्ञान असेल तर ती व्यक्ती वाईट [illegible] करणार नाही. प्रत्येक ज्ञानी व्यक्ती ही शुभच कर्म करेल असा त्यांचा विश्वास आहे. जर व्यक्तीला चांगली कृती माहि

नाईट कृती याचे ज्ञान झाल्यास काळजीची इच्छा नाईट कृती टाळण्याची व चांगली कृती करण्याची होईल.

## सद्गुण शिकवणे शक्य आहे :—

सॉ. ने ग्रीक तत्वज्ञानात सद्गुणाला फार महत्व दिलेले आहे. ग्रीक नितिशास्त्रीय चिंतनात सद्गुण मिमांसा अतिशय महत्वाची समजली जाते. सद्गुण मिमांसा ही एका अर्थाने सॉ.ची ग्रीक तत्वज्ञानाला मिळालेली देणगी आहे.

सर्वसाधारणपणे असे प्रतिपादन केले जाते की सद्गुण व इतर शास्त्रे यांच्यातील फरक आहे. शास्त्र इतर व्यक्तीला शिकवता येतात. समाजशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान इ. शास्त्रे शिकवणे शक्य आहे. परंतु त्याप्रमाणे सद्गुण शिकवणे शक्य आहे असे म्हणता येईल की सद्गुण शिकवता येत नाही.

यापेक्षा सॉक्रेटिसमत वेगळे आहे. सॉ.च्या मते शास्त्राप्रमाणे सद्गुणदेखील व्यक्तींना शिकवता येतात, कोणत्याही व्यक्तीला सद्गुणी होण्यासाठी ज्ञानाची गरज आहे. यथार्थ ज्ञानाशिवाय कोणत्याही व्यक्तीला सद्गुणी होता येत नाही. ज्ञान हे इतरांना शिकवले जाऊ शकते. म्हणून सद्गुणदेखील इतरांना शिकवणे शक्य आहे असे सॉ. स. प्रतिपादन करतो.

काहींच्या मते सद्गुणी होण्यासाठी व्यक्तीला वेगवेगळ्या कारणांची आवश्यकता असते. त्यांच्यामते सद्गुणी होण्यासाठी अनुवंशिकता, पर्यावरण, आणि अभ्यास या कारणांची आवश्यकता असते. ही कारणे उपलब्ध असतील तरच व्यक्ती सद्गुणी बनू शकते. या कारणांच्या अभावी व्यक्तीला सद्गुणी बनवणे शक्य नाही. असे सॉक्रेटिस प्रतिपादन करतो. केवळ ज्ञानामुळेच व्यक्ती सद्गुणी होत नाही. असे त्याचे आग्रही प्रतिपादन होते. सद्गुणासाठी ज्ञान हे एकरूप आहेत असे त्याचे मत आहे. यामुळे सद्गुणी होण्यासाठी स्वभाव, पर्यावरण, या कारणाची आवश्यकता नाही असे त्याला वाटते. व्यक्तीला ज्ञान शिकवता येते. यथार्थ ज्ञान शिकवले गेले तर व्यक्ती सद्गुणी होऊ शकते. अशी त्याची पक्की धारणा होती. यामुळे सॉक्रेटिस असे आग्रहपूर्वक प्रतिपादन करतो की, कोणत्याही व्यक्तीला सद्गुणी बनवता येते म्हणून सद्गुण शिकवणे शक्य आहे.

## सद्गुण एकच आहे :—

प्राचीन ग्रीक तत्वज्ञानामध्ये नैतिक विचाराची सखोल आणि चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. सद्गुण म्हणजे काय? सद्गुणांचे प्रकार किती आहेत या प्रश्नांची सविस्तर चर्चा ग्रीक तत्वज्ञानात दिसते. ग्रीक तत्वज्ञानात खालील तीन प्रकारचे सद्गुण सांगितले आहे. बुद्धीमत्ता, साहस व ज्ञान हे ग्रीक तत्वज्ञानातील प्रमुख सद्गुण आहेत. परंतु सॉ.च्या मते सद्गुणांचे वेगवेगळे विचार मांडण्याची गरज नाही. सॉक्रेटिसच्या मते केवळ एकच सद्गुण आहे आणि ते म्हणजे ज्ञान होय. म्हणजेच ज्ञान हे सद्गुण आहे

असे सॉ. प्रतिपादन करतो. कारण सॉ.च्या मते सत्य सद्गुणाचा प्रत्यक्ष व महत्वाचा ज्ञानामध्येच समाविष्ट झालेला असतो. यामुळे वेगळे प्रकार मांडण्याची गरज नाही. सत्य किंवा यथार्थ ज्ञान हे एकच असते जर यथार्थ ज्ञान एकच असेल आणि ज्ञान म्हणजे सद्गुण मानले तर सद्गुण हे एकच असे म्हटले पाहिजे.

सद्गुण म्हणजे आनंद होय :-

सॉ.ने मानवी जीवनात सद्गुणाला फार महत्वाचे स्थान दिलेले आहे. यामुळेच सॉ. म्हणतो, सद्गुण म्हणजेच ज्ञान. जी व्यक्ती सद्गुणी असते तीच व्यक्ती सुखी, समाधानी आणि आनंदी असते. सद्गुणाशिवाय कोणतीही व्यक्ती आनंदी होऊ शकत नाही. म्हणून सॉ. म्हणतो ज्या व्यक्तीजवळ सद्गुण असतो तीच व्यक्ती सद्गुणी असते म्हणून जीवनात सद्गुणी मिळवायचा असेल तर सद्गुणी होणे आवश्यक आहे. सॉ. म्हणतो सद्गुण म्हणजे आनंद.

सॉ.च्या वरील नैतिक विचारावरून हे स्पष्ट होते की, सॉ. नैतिक विचार केवळ विचारासाठी विचार म्हणून मांडत नाही. नैतिक विचार आणि नियम प्रत्यक्ष वास्तविक जीवनात दिशा आणि आकार देण्यासाठी असतात अशी त्याची धारणा होती. म्हणून त्याने नीतीनियमांचा वास्तविक जीवनाशी संबंध जोडला आहे. सॉ.ने आपले विचार पांडित्य प्रदर्शनात मांडलेले नाही. सॉ.चे सर्वात महत्वाचे योगदान म्हणजे त्यांची नैतिक



विचार केवळ विचाराच्या पातळीवर मांडले नाही तर त्या विचारानुसार संपूर्ण जीवन आचरणात प्रथमतः नैतिकता उतरवली. स्वतःचा जीवन नैतिक बनवले आणि नंतर इतरांना नैतिक बनवण्यासाठी दिशा दाखवली. या सर्व क्रियामधून त्यांनी नैतिकतेचे आनंद निर्माण केले. म्हणून सारवाल तत्वज्ञानातून इतिहास सॉक्रेटीसच्या विचारांना खूप महत्व आहे. म्हणूनच शिसेरोसारखा तत्वज्ञ म्हणतो की, सॉक्रेटिसने स्वर्गातून तत्वज्ञान पृथ्वीवर आणले.

परीक्षण :

सॉ.चे नैतिक विचार अतिशय मोलाचे आहेत. यात शंकाच नाही. तरीपण सॉ.चे नैतिक विचार पूर्णता निर्दोष आहेत असेही म्हणता येत नाही. ॲरिस्टॉटलने त्याच्या नैतिक विचारावर टिका केलेली आहे. त्याच्या मते व्यक्तीच्या आत्म्यात अविवेकाचाही भाग असतो. सॉ. केवळ विवेकाकडेच लक्ष दिले आणि अविवेकाकडे लक्ष दिले नाही.

सॉ.ने आपल्या नैतिक विचाराला फार महत्व दिलेले आहे सॉ.चा असा समज होता की प्रत्येक व्यक्तीच्या कृतीवर बुद्धीचे नियंत्रण असते. व्यक्तीला अचूक ज्ञान झाले की ती व्यक्ती निर्दोष कृती करू शकते. परंतु वस्तुस्थिती अशी दिसते की अनेक व्यक्तींच्या कृतीवर बुद्धी-पेक्षा भावनेचे फार नियंत्रण असते. सॉ.ने ज्ञानास एकच बाजू ग्राहित धरली आणि भावनेकडे दुर्लक्ष

समाजातील बहुसंख्य व्यक्तींना चांगले काय, सत्य काय या सर्वांचे ज्ञान होऊनदेखील त्या काहीतरी वाईट आचरण करतात. वाईट आचरण काय आहे? याचे ज्ञान होऊन देखील माणसे वाईट कृतीपासून स्वतः परावृत्त होत नाहीत. आपल्या नैतिक आचरणासाठी चांगले काय आहे हे समजून चालत नाही तर ते प्रत्यक्ष आचरणात आणण्याची तीव्र इच्छा व्यक्तीजवळ असावी लागते हे विसरून चालत नाही.

सॉ. च्या वरील नैतिक विचारात काही त्रुटी असतील तरीही पण पंचवीसशे वर्षांपूर्वी त्यांनी मांडलेले विचार आजपर्यंतही मानवाला मार्गदर्शक ठरणारे आहेत. म्हणून यासंबंधी दुमत होण्याची आवश्यकता नाही.

(1): तात्विक विचारप्रणालीला तत्वज्ञानाचे तत्वज्ञ

(2): पत्नीचे नाव झॅंटिपी असून ती स्वभावाने खूप तापट होती व भांडखोर होती.

Chapter

## ॲरिस्टॉटलचा कार्यकाळ सिद्धांत :

ॲरिस्टॉटल हा एक थोर ग्रीक तत्वज्ञ आहे. मॅसिडोन या राज्याचा वैद्य निकोमॅकस यांचा हा मुलगा होता. याचा जन्म स्टॅगरीस येथे ख्रिस्तपूर्व ३८४ मध्ये झाला. इ.स.पूर्व ३६७ मध्ये याने शिक्षणासाठी अथेन्स येथील प्लेटोच्या ॲकॅडमीमध्ये प्रवेश घेतला. ॲरिस्टॉटल प्लेटोच्या मृत्यूपर्यंत ॲकॅडमीतच होता. ॲरिस्टॉटलने मॅसिडोनचा राजा दुसरा फिलीप याचा मुलगा अलेक्झांडर याला शिक्षणाचे काम त्याने केले. ॲ. ने अथेन्स येथे लायसियम नावाची पाठशाळा सुरू केली. वयाच्या ६२ व्या वर्षी कॅलसिस येथे त्याचा मृत्यू झाला.

ॲ. चे तत्वज्ञानाला फार महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. कारण त्याने तत्वज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांमध्ये मौलिक विचार मांडलेले आहेत. त्याचे सर्व लेखन हे मूलभूत स्वरूपाचे होते.

ॲ. च्या एकंदर लिखाणाचे तीन भाग पडतात.

(1) सर्वसाधारण लोकांसाठी त्याने लिहिलेले लिखाण हे सामान्यतः प्लेटोच्या धर्तीवर लिहिलेले संवाद स्वरूपाचे आहे. यामध्ये पत्रे, कविता यांचा समावेश आहे. हे लिखाण मूळातून उपलब्ध झालेले नाही.

(2) ॲ. ने वैज्ञानिक आणि राजकीय लिखाणासाठी जमवलेली व ~~[illegible]~~ शिष्यांमार्फत जमवलेली नोंदी यांचा समावेश आहे. भिन्नभिन्न १५८ राज्यघटनेचा त्याने संग्रह केलेला होता. त्यामध्ये फक्त अथेन्स राज्याची राज्यघटना

उपलब्ध आहे.

② ॲ. ने विज्ञानविषयक व तत्वज्ञानात्मक अनेक ग्रंथ लिहिले. तर्कशास्त्र, जीव, भौतिक, मानसशास्त्र, नीतिशास्त्र या विषयावर त्यांनी अनेक स्फूट लेखन केलेले आहे. विशेषतः तत्वज्ञानात सत्ता, मीमांसा, सौंदर्यशास्त्र या तत्वज्ञानाच्या शाखांवर मूलभूत लिखाण केले आहे. या सर्व ग्रंथातून त्यांचे मौलिक चिंतन प्रगट झालेले दिसते.

सुप्रसिद्ध ग्रीक तत्वज्ञ ॲ. यांनी तत्वज्ञानाला अनेक मौलिक तात्विक संकल्पना दिल्या. त्यापैकी कार्यकारण सिद्धांत ही एक संकल्पना होय. कार्यकारण सिद्धांत ही ॲ. ने तत्वज्ञानाला दिलेली फार मोलाची देणगी आहे. ॲ. च्या पूर्वी कोणत्याही ग्रीक तत्वज्ञानी कार्यकारण सिद्धांताचा त्यांच्यासारखा सखोल व सविस्तर सिद्धांत केलेला नाही. त्याने कार्यकारण सिद्धांताचे केलेले विवेचन अत्यंत मूलभूत व मौलिक स्वरूपाचे आहे.

ॲ. च्या मते कशाचेही ज्ञान होणे म्हणजे त्याच्या कारणाचे ज्ञान होणे होय. बीजापासून वृक्ष तयार होणे, दगडापासून मूर्ती तयार होणे या प्रक्रियेची कारणे समजली तर त्याचे स्वरूप आपल्याला समजू शकते. बदलाच्या किंवा प्रक्रियेच्या स्वरूपाचा उलगडा करण्यासाठी कारणाचा उपयोग होतो असे ॲ. चे मत होते म्हणून त्याने कार्यकारण सिद्धांत आविष्काराने मांडलेला आहे.

**कारण आणि प्रयोजन यातील भेद :-**

ॲ. ने कार्यकारण संज्ञांचा अर्थात सूक्ष्म पद्धतीने विचार केलेला नाही. ॲ. ने प्रथमतःच कारण आणि प्रयोजन यामध्ये भेद केला आहे. त्याच्यामते या दोन्हीत फरक आहे. उदा:- रोग हे मृत्यूचे कारण होऊ शकते. परंतु रोग हे मृत्यूचे प्रयोजन होऊ शकत नाहीत. कारणामुळे कोणत्याही गोष्टीचे आपल्याला स्पष्टीकरण देता येते. कारण हे कोणत्याही गोष्टीला कारणीभूत असते. कारण हे घटना किंवा कार्य घडण्यास कारणीभूत ठरते. प्रयोजनामुळे घटना घडत नाहीत तसेच घटना व कार्याचे स्पष्टीकरणही देता येत नाही. म्हणून कारण आणि प्रयोजन यात भेद केला पाहिजे असे ॲ. भेद करतो.

**कार्यासाठी - चार कारणांची गरज :-**

कार्यासाठी चार कारणांची आवश्यकता असते असे सर्वप्रथम ॲ. सिद्ध करतो. ॲ.च्या मते कोणतीही घटना व कार्य अस्तित्वात येण्यासाठी चार कारणांची आवश्यकता असते. विज्ञानात घडणाऱ्या प्रत्येक घटनेला कारण असते. कारणाशिवाय कार्य व घटना अस्तित्वात येऊ शकत नाही. ॲ. च्या मते कोणतीही घटना व कार्य अस्तित्वात येण्यासाठी चारही कारणे आवश्यक असतात. या चार कारणांपैकी एखादे कारण जरी अनुपस्थित असले तरी कार्य निर्माण होऊ शकत नाही. यामुळे ॲ. अत्यावश्यक सर्वांचे प्रतिपादन करतो की प्रत्येक

कार्य घडण्यासाठी चारही कारणांची उपस्थिती असणे आवश्यक आहे.

कारणाचे प्रकार :—

ॲ. ने कारणाचे खालील चार प्रकार सांगितले आहेत.

1) उपादान कारण
2) आकारिक "
3) निमित्य "
4) अंतिम "

ॲ. असे प्रतिपादन करतो की, कोणतीही घटना किंवा कार्य घडण्यासाठी उपादान कारण आकारिक, निमित्य व अंतिम ही चारही कारणे आवश्यक आहेत.

* उपादान कारण :—

ॲ. च्या चतुर्विध कारणातील उपादान कारण हे पहिले महत्वाचे कारण आहे. त्याला आवश्यक कारण असेही म्हणतात. कोणतीही घटना किंवा कार्य ज्या अधिष्ठानाने अस्तित्वात येते त्या कार्याच्या किंवा घटनेच्या आधार अधिष्ठानाला उपादान कारण असे म्हणतात.

उदा:- पुतळा हे कार्य/घटना ज्या धातूनी घडते त्या धातूला पुतळा या कार्याचे उपादान कारण म्हणतात. यावरून हे स्पष्ट होते की ज्या द्रव्या-पासून वस्तू तयार केली जाते त्या द्रव्याला त्या वस्तूचे उपादान कारण असे म्हणतात.

1) घट हे माती या द्रव्यापासून तयार होते. म्हणून माती हे उपादान कारण होय.

2) सोन्याची अंगठी ही सोने या धातूपासून निर्माण होते म्हणून सोने हे सोन्याच्या अंगठीचे उपादान कारण होय. तेच

1) लाकूड — टेबल.

उपादान कारण म्हणजे वस्तूचा कच्चा माल किंवा साधनसामुग्री होय. या साधनसामुग्रीतून किंवा कच्च्या मालातून कोणतीही वस्तू आकार घेते त्या कच्च्या मालाला किंवा साधनसामुग्रीला उपादान कारण असे म्हणतात. उपादान कारण अस्तित्वात असल्याशिवाय कोणतीही घटना किंवा कार्य अस्तित्वात येऊ शकत नाही. माती असल्याशिवाय मातीचे भांडे बनू शकत नाही. टेबल, खुर्च्या तयार होण्यासाठी लाकूड असल्याशिवाय शक्य नाही. कोणतीही वस्तू वा घटना अस्तित्वात येण्यासाठी कोणत्या ना कोणत्या द्रव्याची गरज असते. द्रव्याशिवाय वस्तू आकार तयार होत नाही. या वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की प्रत्येक घटना किंवा कार्य अस्तित्वात येण्यासाठी उपादान कारणाची गरज असते.

+ निमित्य कारण :—

ॲ. ने सांगितलेल्या चार कारणांपैकी हे दुसरे कारण होय. त्याच्या मते वस्तू व घटना अस्तित्वात येण्यासाठी उपादान कारणाप्रमाणे निमित्य कारणाचीही आवश्यकता असते, ज्यामुळे वस्तू वा घटना निर्माण होते किंवा द्रव्याला गती वा आकार प्राप्त होतो त्याला निमित्य कारण असे म्हणतात. या कारणामुळे द्रव्यात बदल होत असतो

उदा:- लाकडातून खुर्ची वा टेबल किंवा दारे, खिडक्या

इत्यादि वस्तू तयार होतात. या लाकडाला आकार देणारा सुतार असतो. म्हणून सुतार हा खुर्ची टेबल आदी वस्तूचे निमित्त कारण बनतो.

② सोन्यापासून अंगठी तयार करणारा सोनार हा अंगठी या वस्तूचे निमित्त कारण होय यावरून हे स्पष्ट होते की द्रव्याला आकार देणाऱ्या घटकाला निमित्त कारण म्हणतात. निमित्त कारणाशिवाय कोणतीही वस्तू अस्तित्वात येऊ शकत नाही. सोने असेल तर सोनाराशिवाय अंगठी अस्तित्वात येऊ शकत नाही.

लाकूड असले तरी सुताराशिवाय टेबल, खुर्ची अस्तित्वात येत नाही.

संगमरवरी दगड असला तरी शिल्पकाराशिवाय मूर्ती अस्तित्वात येत नाही.

यामुळे द्रव्याला गती प्राप्त होते. द्रव्यात हालचाल निर्माण होते. द्रव्याला आकार प्राप्त होतो. त्या घटकाला निमित्त कारण म्हणतो.

आकारिक कारण :-

ॲरिस्टॉटलच्या कारण चतुष्टयातील हे महत्त्वाचे तिसरे कारण होय. कोणतीही वस्तू वा घटना अस्तित्वात येण्यासाठी उपादान कारण, निमित्त कारण या कारणांची जशी गरज असते, तशीच आकारिक कारणाची देखील आवश्यकता असते. आकारिक कारण अस्तित्वात असल्याशिवाय वस्तू वा घटना अस्तित्वात येऊ शकत नाहीत. द्रव्यापासून कोणत्या आकाराची वस्तू तयार करावयाची याबद्दल कारागिराच्या डोळ्यात विशिष्ट अशी कल्पना असते. वस्तूसंबंधीच्या या विशिष्ट कल्पनेला आकारिक कारण असे म्हणतात.

उदा :- सोने या द्रव्यापासून सोन्याची अंगठी कशी तयार करावी याची संकल्पना सोनाराच्या डोळ्यात असते. त्या कल्पनेनुसार सोन्यापासून विशिष्ट आकाराची अंगठी तो तयार करतो. सोनाराच्या डोळ्यातील अंगठीची कल्पना हे अंगठीचे आकारिक कारण होय.

② त्याप्रमाणे सुताराच्या डोळ्यात खुर्ची वा टेबल तयार करण्यासंबंधी एक विशिष्ट कल्पना असते त्यानुसार तो टेबल, खुर्ची तयार करतो. या कल्पनेनुसार तो लाकडाला विशिष्ट आकार प्राप्त करून देतो. म्हणून ही कल्पना येथे आकारिक कारण बनते.

घटना व कार्य यांचे सार म्हणजे आकारिक कारण होय. वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की कारणाचे कार्यात परिवर्तन होताना कार्याला जो आकार प्राप्त होतो त्याला आकारिक कारण असे म्हणतात. संगमरवरी दगडाला जो आकार मिळतो त्या आकाराला आकारिक कारण होय म्हणतात. दगडात आकार अंतर्भूत असतो असे नाही. फक्त आकार घेण्याची क्षमता त्या दगडामध्ये असते. यामुळे कोणतीही वस्तू वा घटना अस्तित्वात येण्यासाठी आकारिक कारण हे अत्यंत महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन केले.

④ अंतिम कारण :-

वस्तू वा घटना अस्तित्वात येण्यासाठी अन्य तीन कारणांप्रमाणे अंतिम कारणाची उपस्थिती असणे आवश्यक आहे. वस्तू या घटनेचे जे मुख्य प्रयोजन असते त्या प्रयोजनाला अंतिम कारण असे म्हणतात.

अंतिम कारणामुळे वस्तू वा घटनेचे साध्य, हेतू प्रयोजन निर्धारीत होत असतो. अंतिम कारणामुळेच वस्तू वा घटनेचे पुर्ण स्वरूप वा प्रयोजन स्पष्ट होते. लाकडापासून सुतार जेव्हा खुर्ची वा टेबल तयार करतो. तेव्हा त्या निर्मितीचे हेतू वा प्रयोजन त्याच्या डोक्यात असते. या प्रयोजनाला वा साध्याला अंतिम कारण म्हणतात.

अॅ. नी कारणासंबंधी त्या काळातदेखील अतिशय सुक्ष्म विचार मांडलेले आहेत कारण कल्पना ही त्याची तत्वज्ञानाला मिळालेली महत्वाची देणगी आहे. प्रत्येक घटनेला कारण असते. कारणाशिवाय घटना वा कार्य घडू शकत नाही असे आपण म्हणतो. परंतु पुढे जाऊन अॅ.ने असे प्रतिपादन केले कोणत्याही कार्यासाठी वर उल्लेखलेल्या चार कारणांची गरज असते. एवढेच नव्हे तर हे चार कारणे एकाचवेळी उपस्थित असल्याशिवाय कार्य किंवा घटना अस्तित्वात येऊ शकत नाहीत. या चार कारणांपैकी एकही कारण अनुपस्थित असेल तर कार्य अस्तित्वात येऊ शकत नाही. यामुळे अॅ. असे प्रतिपादन करतो की कोणत्याही कार्यासाठी किंवा घटना अस्तित्वात येण्यासाठी ही चारही कारणांची उपस्थिती आवश्यक व अनिवार्य आहे.

अॅरिस्टॉटलच्या ईश्वरविषयक विचाराची सविस्तर चर्चा करा / ईश्वरविषयक सिद्धांत :-

अॅ. च्या विचारात ईश्वर संकल्पनेला महत्व दिलेले दिसते. ईश्वराची समस्या ही तत्वज्ञानातील एक सनातन समस्या आहे. तत्वज्ञानाच्या इतिहासात ईश्वराची समस्याही चर्चेच्या केंद्रस्थानी दिसून येते. यामुळेच अनेक तत्ववेत्त्यांनी ईश्वरविषयक आपापली मते मांडलेली आहेत. अॅ. ने देखील ईश्वरविषयक आपले मत मांडलेले आहे.

अॅ. ने आपल्या तत्वज्ञानात आकार व द्रव्य ही दोन तत्वे मांडलेली आहेत. अॅ. म्हणतो या विश्वातील सर्वच वस्तू या दोन तत्वापासून अस्तित्वात आलेले आहेत. विश्वातील या सर्व वस्तू म्हणजे आकार आणि द्रव्य या दोन तत्वांचा संयोग असतो. थोडक्यात अॅ.च्या मते आकार आणि द्रव्य ही दोन अंतिम तत्वे आहेत. सर्व वस्तूंच्या अस्तित्वास ही दोन तत्वे कारणीभूत असतात. विश्वात जी वि[illegible] ला दिसते ती देखील या कारणामुळेच. विश्वाचा विकास होत असतो यासाठी गती आवश्यक असते. विश्वातील जड द्रव्यातही गती असते. विश्वातील गतीला, गतीशील करण्याचे कार्य ईश्वर करतो. याचा अर्थ ईश्वर हा गतीचा आद्य प्रवर्तक आहे. या विश्वात गती हालचाल परिवर्तन सतत घडून येते हे परिवर्तन घडून आणणारा असा कोणी असला पाहिजे तो म्हणजे ईश्वर होय असे अॅ. प्रतिपादन करतो, अॅ.चा ईश्वर स्वतः गतीशील न[illegible] पण तो विश्वात गतीशीलता निर्माण करतो. [illegible]

ॲ. नी ईश्वराला आद्यचालक म्हणतो.

**ईश्वर विकासाची अंतिम अवस्था आहे :—**

ॲ. च्या मते या विश्वात सतत विकास होत असतो. विश्व म्हणजे विकासाची श्रृंखला असते. विकासाच्या विविध अवस्था असतात. विश्वातील विकासाची अंतिम अवस्था म्हणजे ईश्वर होय. ईश्वर हा नित्य असतो. ईश्वरात परिवर्तन होत नसल्याने तो अपरिवर्तनीय असतो. ईश्वर या जगातील शुद्ध सत्ता आहे. म्हणजेच विश्व विकासातील अंतिम सत्ता म्हणजे ईश्वर होय.

**ईश्वर हे विश्वाचे आकारीक कारण आहे :—**

ॲ. ने असे प्रतिपादन केले की, ईश्वर हे या विश्वाचे आकारीक कारण आहे. याचाच अर्थ ईश्वर हे विश्वाचे आकारीक निमित्य आणि अंतिम कारण आहे. ॲ. ने कारणाचे चार प्रकार सांगितलेले आहेत. कारणाच्या या चार प्रकारापैकी आकारीक कारण हे मुख्य कारण आहे. ज्यामुळे वस्तूला वा घटनेला स्वरूप प्राप्त होते. किंवा ज्या वस्तूला वा घटनेला विशिष्ट रचना प्राप्त होते त्याला आकारीक कारण असे म्हणतात.

ॲ. च्या मते या विश्वाला वा विश्वातील व्यक्तींना जी रचना प्राप्त होते ती ईश्वरामुळेच. विश्वातील वस्तू जड द्रव्याने तयार झालेले असतात. परंतु या जड द्रव्यांना विशिष्ट आकार जड द्रव्यामुळे प्राप्त होतो. यामुळे
ईश्वरामुळे

ईश्वर हे या विश्वाचे आकारीक कारण आहे असे ॲ. प्रतिपादन करतो.

**ईश्वर विश्वाचे निमित्य कारण आहे :—**

ॲ. च्या मते ईश्वर हे विश्वाचे आकारीक कारण आहे. त्याचप्रमाणे निमित्य कारणदेखील आहे. वस्तू व द्रव्यामध्ये ज्यामुळे गती निर्माण होते त्याला निमित्य कारण असे म्हणतात. ईश्वरामुळे विश्वातील वस्तूमध्ये गतीशिलता निर्माण होते म्हणून ईश्वर हे या विश्वाचे निमित्य कारण होय. गतीमुळे विकास होत असतो. या विकासाला ईश्वर कारणीभूत असतो. पण तो स्वत: गतीशिल असत नाही. परंतु त्याच्यामध्ये वस्तूमध्ये गतीशिलता निर्माण करण्याची क्षमता असते. म्हणून ईश्वर विश्वाचे निमित्यकारण आहे.

**ईश्वर विश्वाचे अंतिम कारण आहे :—**

ॲ. च्या मते ईश्वर हे विश्वाचे अंतिम कारण आहे. ईश्वर हे पुर्ण आदर्शरूपी असतो. विकासाची सर्वोच्च अवस्था म्हणजे ईश्वर होय. विश्वाच्या विकासप्रक्रियेत ईश्वराच्या स्वरूपाला अंतिम प्रयोजन वा ध्येय मानले जाते. वास्तवात ईश्वर हेच आदर्श आहे. ईश्वराचे हे आदर्शरूप विश्वातील सर्वच वस्तूमध्ये प्रगट होत असते. विश्वात आढळणारे विविध गुण आणि वैशिष्ट्य म्हणजे ईश्वराच्या आदर्शरूपाची अभिव्यक्ती होय. या विश्वात आपल्याला ज्या त्रुटी आढळतात जो अपुरेपणा आढळतो त्या त्रुटी पुर्ण केल्यास किंवा अपुरेपणा नष्ट केला तर त्या वस्तू ईश्वरस्वरूपी बनू शकतात त्यामुळे ॲ. म्हणतो ईश्वर हे अंतिम कारण आहे. ईश्वर हा विकास प्रक्रियेचा प्रवर्तक आहे. ॲ.च्या

मते विश्वात विकासप्रक्रिया ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. विश्वातील या विकासप्रक्रियेचा ईश्वर हा मुख्य प्रवर्तक आहे. यामुळे ॲरि. म्हणतो ईश्वर हा विश्वाचा आद्यचालक आहे. कारण या विश्वात ज्या घटना घडतात त्या घटना घडवणारी एक प्रेरक शक्ती असते. ही प्रेरक शक्ती म्हणजेच आद्यचालक ईश्वर होय.

हे विश्व अनादी कालापासून चालत आहे. जगाची निर्मिती कोणीही केलेले नाही. परंतु या जगाला गती व आकार देण्याचे काम ईश्वर करतो. म्हणून तोच या विकास प्रक्रियेचा चालक आहे. ईश्वर स्वतः गतिमान न होता विश्वातील सर्व घटनांमध्ये गतिमानता घडवून आणतो हे ईश्वराचे स्वरूप विरोधाभासात्मक वाटत असले तरीही ईश्वराच्या बाबतीत मात्र खरे आहे. म्हणून ॲरि. ईश्वराला अचल चालक असे म्हणतो.

ईश्वराची गती बौद्धिक स्वरूपाची असते :- ॲरि. च्या मते ईश्वर विश्वाचा आद्यचालक आहे. हा अभौतिक आहे. यामुळे तो शारीरिक क्रिया करू शकत नाही. ईश्वराच्या सर्व क्रिया बौद्धिक स्वरूपाच्या असतात. यामुळे तो म्हणतो ईश्वराची गती शारीरिक स्वरूपाची नसते तर ती बौद्धिक स्वरूपाची असते.

## ॲरिस्टॉटलची द्रव्य आणि आकार संकल्पना:

पाश्चात्य तत्वज्ञानात ॲ.च्या द्रव्य व आकार या संकल्पनेला विशेष असे महत्व आहे. ॲ.ने संपूर्ण जगाची निर्मिती द्रव्य आणि आकार या दोन तत्वापासून झाली आहे असे प्रतिपादन केले म्हणजेच संपूर्ण विश्वाचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न ॲ.ने द्रव्य व आकार यांच्या सहाय्याने केला आहे. म्हणून द्रव्य आणि आकार हे विश्वाचे अंतिम दोन तत्व मानले आहेत.

स्वरूप :- ॲ.ने द्रव्य आणि आकार यांना अतिशय महत्व दिले आहे. द्रव्य आणि आकार याविषयी अत्यंत सूक्ष्मपणे विवेचन केलेले दिसून येते. ॲ.ने प्लेटोच्या कल्पनेवर टिका केली आहे. प्लेटोच्या मते सामान्य हेच एकमेव द्रव्य आहे परंतु ॲ. असे प्रतिपादन करतो की सामान्य हे वस्तूच्या बाहेर नसून ते विशेष वस्तूमध्ये विद्यमान असते ॲ.च्या मते द्रव्य हे स्वतंत्र आहे ते आपल्या अस्तित्वासाठी कशावरही अवलंबून नाही. म्हणजेच द्रव्य हे स्वतंत्र आणि कालातीत आहे. प्लेटोचे सामान्य हे तत्व द्रव्य नसून नाही. त्याचप्रमाणे विशेष देखील द्रव्य नाही. तर द्रव्य हे आकार आणि मला यांचा प्रतिमाय्य संघात आहे.

द्रव्य आणि आकार यांना परस्परांपासून वेगळे करता येत नाही. कारण प्रत्येक वस्तू कोणत्या ना कोणत्या द्रव्याची बनलेली असते त्यामुळे द्रव्य आणि आकाराशिवाय वस्तू अस्तित्वात येऊ शकत नाही. द्रव्यमध्ये सूक्ष्मधर्म वेगळे असतात आणि आकाराचे गुणधर्म वेगळे असतात. तरीपण प्रत्यक्षात परस्परांपासून द्रव्य आणि आकार यांना आपण काल्पनिकदृष्ट्या वेगळे करू शकत नाही. केवळ समजण्यासाठी आपण मनात किंवा कल्पनेत द्रव्य आणि आकार यामध्ये फरक करीत असतो. प्रत्यक्षात त्यांना वेगळे करता येत नाही. द्रव्याशिवाय आकाराचा आणि आकाराशिवाय द्रव्याचा विचारच करू शकत नाहीत. म्हणून या विश्वातील सर्व वस्तू द्रव्य आणि आकार या दोन घटकापासून अस्तित्वात येतात.

द्रव्याचे स्वरूप :-

ॲ.च्या मते द्रव्य व आकार यांचा घनिष्ट संबंध आहे द्रव्यासंबंधी सर्वसामान्यपणे आपली अशी धारणा असते की द्रव्य हे अवास्तविक द्रव्यच असते. द्रव्य हे भौतिक आहे तसेच ते जड असते. परंतु ॲ.ची द्रव्याविषयीची संकल्पना यापेक्षा वेगळी आहे. ॲ.ची द्रव्याविषयीची अशी कल्पना आहे की, द्रव्य हे तरल आणि लवचिक स्वरूपाची आहे. म्हणजेच ॲ.ची द्रव्यविषयक संकल्पना ठोकळेबाज नाही. ज्यामध्ये परिवर्तन घडते त्याला ॲ. द्रव्य म्हणतो. म्हणजेच सर्व उपादानकारण

परिवर्तनात समागमा बदल होतो किंवा काही घडते किंवा जे परिवर्तनीय असते ते म्हणजे द्रव्य होय. म्हणजेच ज्यामध्ये बदल घडून येतो त्याला ॲरि. द्रव्य असे म्हणतो. ॲरिस्टॉटलचे मत द्रव्य हे कोणत्याही घटनेचे किंवा वस्तूचे विशेषण होत नाही तर ते सर्वत्र उद्देश्य असते. यावरून हे स्पष्ट होते की, द्रव्य हे परिवर्तनशील आहे. त्यात सतत बदल घडून येतो.

**आकाराचे स्वरूप :—**

ॲरि.ने द्रव्याप्रमाणे आकारालाही महत्त्व दिले. कोणत्याही द्रव्याला जे रूप प्राप्त होते त्याला ॲरि. आकार म्हटले आहे. द्रव्यात ज्याच्या दृष्टीने बदल होतो त्याला आकार असे म्हणतात. खुर्ची, टेबल यांच्या संदर्भात विचार केल्यास लाकूड हे द्रव्य तर लाकडांचे जे रूप आहे तो त्यांचा आकार होय. आकाराशिवाय वस्तू अस्तित्वात येऊ शकत नाही. कोणतीही वस्तू अस्तित्वात येण्यासाठी द्रव्याप्रमाणेच आकाराची गरज असते. आकारामध्ये सर्व गुणधर्मांचा अंतर्भाव असतो ते सर्व गुणधर्म सामान्य स्वरूपात असतात.

**आकार आणि आकृती :—**

ॲरि.च्या आकारामध्ये आकृतीचा सुद्धा समावेश होतो. पण सर्वसाधारणपणे असे म्हटले जाते की आकृती आणि आकार यामध्ये अंतर आहे हे मत ॲरि.ला मान्य नाही. कारण आकृती हा आपण पाहतो तर आकार काही दृष्टिकोनातून द्रव्य बनतो.
उदा:- की, चेप, झाड, लाकूड.

आकृती हे आकाराचे एक अंग आहे. आकारात वस्तूच्या सर्व गुणधर्मांचा समावेश होतो. आकारामध्ये वस्तूतील परस्पर संबंध, गुणधर्म, हेतू, प्रयोजन, साध्य अशा अनेक घटकांचा समावेश होतो. म्हणून आकृती आणि आकार यांच्यात अंतर नाही तर आकृती ही आकाराचाच एक भाग आहे. म्हणून द्रव्य आणि आकार ही संकल्पना सापेक्ष आहे.

**द्रव्य आणि आकार – सापेक्ष कल्पना :—**

द्रव्य व आकार या दोन सापेक्ष कल्पना आहेत. ॲरि.च्या मांडणीवरून हे स्पष्ट दिसते. द्रव्य आणि आकार या दोन सापेक्ष कल्पना असून त्या अविभाज्य आहेत. एखाद्या वेळेस द्रव्य हे आकाराचे रूप देखील धारण करू शकते. एका संदर्भात द्रव्य असते तर दुसऱ्या संदर्भात ते आकार बनते.

उदा:- टेबलाच्या संदर्भात लाकडाचा विचार केला लाकूड हे द्रव्य असते. पलंगाच्या संदर्भात विचार केल्यास लाकूड हे द्रव्य असते तर झाडाच्या विचार केला तर तेच लाकूड आकार बनते. म्हणून ॲरि.च्या द्रव्य आणि आकार या संकल्पना सापेक्ष आहेत.

द्रव्य आणि आकार हे परस्परावलंबी असून वेगळे नाहीत कोणतीही वस्तू अस्तित्वात

असण्यासाठी द्रव्य आणि आकाराची गरज असते. द्रव्य नसल्याशिवाय आकार निर्माण होत नाही आणि आकाराशिवाय द्रव्याला अर्थ प्राप्त होत नाही. यामुळे द्रव्य व आकार एकत्रच असतात त्यांना परस्परांपासून विभक्त करता येत नाही. द्रव्य आणि आकार यांच्या संयोगातून विश्वातील सर्व वस्तू अस्तित्वात येतात. जर द्रव्य नसेल किंवा आकार नसेल तर वस्तू अस्तित्वात येत नाही. म्हणून जो म्हणतो द्रव्य आणि आकार यांचे सहअस्तित्व असते. यांच्यात घनिष्ठ संबंध असतो. जसे नसले तरीपण व्यवस्था हे वस्तूच्या गुणधर्माचे अधिष्ठान असते. द्रव्याला स्वतःचा कोणताही गुणधर्म नसतो. ते भावीकारी व गुणांनी गुणविकारी आहे. वस्तूला जे जे काही निश्चित रूप किंवा गुणधर्म निर्माण होतात ते ते त्या वस्तूच्या आकारावरून. आकारामुळे द्रव्याला विशिष्ट रूप निर्माण होते. पण द्रव्यात मात्र काहीही फरक पडत नाही. सोने या द्रव्यापासून आपण विविध दागिने तयार करतो. म्हणजेच एकाच द्रव्यापासून विविध आकार निर्माण होऊ शकतात. चांदी या एकाच द्रव्यापासून विविध आकाराचे दागिने तयार करता येतात. याचाच अर्थ एकच द्रव्य असले तरी आकार मात्र भिन्न भिन्न असतो. एकाच आकाराच्या वस्तू असतात. पण त्यांचे गुणधर्म मात्र भिन्नभिन्न असतात. उदा. मूर्ती एकाच आकाराची असते. ती मूर्ती सोन्याची, चांदी, पितळ अशा भिन्नभिन्न द्रव्याची असू शकते. मूर्तीचा आकार सारखा आहे पण त्याचे द्रव्य मात्र भिन्न आहे.

या विवेचनावरून हे स्पष्ट होते की एकाच द्रव्यापासून वेगवेगळ्या आकाराच्या वस्तू अस्तित्वात येऊ शकतात. आणि एकाच आकाराच्या वस्तू भिन्न द्रव्याच्या असू शकतात.

ईश्वर :-

ईश्वर आणि जग यांचा संबंध कुंभकार संबंधासारखा आहे. ईश्वराने हे जग निर्माण केले म्हणून ॲ. ईश्वराला अचल चालक म्हणतो. पण द्रव्य आणि आकार यामध्ये गती निर्माण होऊन या विश्वातील सर्व वस्तू निर्माण झालेल्या आहेत. म्हणून हे दोन तत्त्व विश्वाचे अंतिम कारण होय.

(1) निकोमॅकस याचा मुलगा ॲरिस्टॉटल.
(2) निकोमॅकस हा मॅसिडोनियाचा राजा ॲमिन्टॉस याचा वैद्य होता.
(3) लहानपणी वडील वारल्याने त्याचे शिक्षण, पालन म्हणून असलेल्या प्रॉक्सिनस ने पूर्ण केले.
(4) ॲरिस्टॉटलचा मृत्यू खि. पू. 322 मध्ये झाला.

## जन्म, घराणे, कौटुंबिक माहिती

इ.स. ४२८ मध्ये जून महिन्यात प्लेटोचा जन्म झाला. अथेन्स पासून जवळच असलेले एक बेट (एजिना) हे त्याचे जन्मस्थळ होय. त्याचा जन्म एका उच्च कुळात झाला. त्याचे वडिल अरिस्टान हे अथेन्सच्या अखेरचा राजा कोड्रस याच्या घराण्यातील होता. त्याची आई सुध्दा उच्च कुळातील असुन तिचा जन्म सोलान घराण्यात झाला. थोडक्यात असे म्हणता येईल की प्लेटोचा जन्म मूळात उच्च वारसा असलेल्या घरात झाला. प्लेटो लहान असतानाच त्याच्या वडिलांचा मृत्यू झाला. त्यानंतर आईने मात्र पायरिलॅम्पस नावाच्या एका व्यक्ती बरोबर लग्न केले. ही व्यक्ती जवळची नातेवाईक होती. त्याचेही पूर्वी लग्न झाले होते. त्यालाही डेमस नावाचा एक मुलगा असून आर्कॅडेमीअन येथे झालेल्या युध्दात नावारूपाला आलेला होता. प्लेटोचे लहानपण त्याच्या या सावत्र वडिलांच्या सहवासात गेले.

सॉक्रेटीसाचा एक निष्ठावान शिष्य म्हणून शेवटपर्यंत त्याने कार्य केले. सॉक्रेटीसाचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या मनावर फार परिणाम झाला. त्या नंतर त्याने जवळजवळ दहा वर्षे विविध देशात भ्रमण केले. याच काळात प्रसिध्द गणिती युक्लिडची व प्लेटोची भेट झाली. इजिप्त, सिसिली, इटाली इत्यादी भागात त्याने प्रवास केला. हा प्रवास आटोपल्यानंतर तो अथेन्स येथे येऊन त्याने एका अॅकॅडेमीची स्थापना केली. या अॅकॅडेमीत गणित, तत्त्वज्ञान व तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांवर शिक्षण देण्याचे काम चालू होते. या संस्थेचे सदस्य तत्त्वज्ञान विषयातील गंभीर विषयावर विचारविनिमय करीत असत.

जन्माने उच्च, जीवन आदर्शमय, स्वभावाने अतडजोडवादी व चिंतनाने आदर्शवादी असे हे प्लेटोचे वर्णन अत्यंत सार्थ ठरते. प्लेटोने केवळ तत्त्वज्ञानात्मक विचार सांगितले असे नव्हे तर सॉक्रेटीसाने सांगितलेल्या विचारालाही सुव्यवस्थित असे रूप दिले. त्याचे बहुतेक लिखाण संवादाच्या स्वरूपात आहे. त्याने लिहिलेल्या अनेक ग्रंथांचा उल्लेख वर आला आहे. असे म्हटले जाते की, ग्रीक तत्त्वज्ञानाचा सर्वोत्कृष्ट विकास हा प्लेटोच्या तत्त्वज्ञानात प्रतिबिंबित होतो. म्हणूनच त्याला 'पूर्ण ग्रीक' या पदवीने सन्मानित करण्यात येते.



## (२) चिंतन पध्दती (Method of thinking)

प्लेटोने एका विशाल व प्रभावशाली तत्त्वज्ञानात्मक प्रणालीची स्थापना केली. पार्मेनायडीस नावाच्या तत्त्ववेत्त्याने 'सत् आणि आभास' (Reality and Appearance) या दोन्हीमध्ये काहीसे अंतर ठेवले आणि एक अंतिम तत्त्व म्हणून सत् तसेच या तुलनेत अनेकता आणि गति यांना आभास मानले. त्याचप्रमाणे हेराक्लिटस याने गति आणि संभवतेला सत् आणि नित्यता मानले आहे तर स्थिरतेला आभास मानले. प्लेटोच्या तत्त्वज्ञानामध्येही सत् व आभास या दोन्हींमध्ये असणारा फरक स्पष्ट स्वरूपात केल्याचे दिसते म्हणूनच तो म्हणतो की, फक्त आयडिया परमसत्य असून आपल्या दृष्टीला दिसणाऱ्या भौतिक वस्तू या सर्व आभास होत. तो पुढे असे म्हणतो की, प्रत्यक्षाच्या माध्यमातून जे ज्ञान मिळाले आहे ते एका अर्थाने भासमान होय.

प्लेटोच्या एकंदर विचारात अगदी प्रारंभ काळातील ग्रीक तत्वचिंतकांच्या विचारधारांचा समन्वय दिसून येतो. प्लेटोचे जे काही लिखाण आहे, ते पूर्णपणे संवादरूपात आहे. त्याचे सर्व चिंतन या समाजपध्दतीमध्ये दडले असल्याचे दिसून येते स्वतः प्लेटोने या पध्दतीचे नामकरण 'द्वंद्व पध्दती' असे केले. पुढे तो असे म्हणतो की, ही अशी एक एकमेव पध्दती आहे की, कोणत्याही विषयात तिचा वापर योग्य रीतीने होऊ शकतो. या पध्दतीत असेही व्यक्त करण्यात आले आहे की मनुष्यामध्ये फक्त विशिष्ट अशा बौध्दिक विश्लेषणाची क्षमता नसून अशी एक प्रज्ञात्मक बुध्दी (विवेक) आहे की ज्याच्यामध्ये परस्पर विरोधी विचारधारा योग्य प्रकारे समजावून घेता येऊ शकते तसेच आधुनिक काळातील विश्लेषणवादी विचारवंतानीही या पध्दतीला महत्त्व दिल्याचे दिसून येते म्हणूनच प्लेटोने सांगितलेले तत्त्वज्ञानात्मक विचार व त्याचे महत्त्व याची प्रचिती येते.

प्लेटोने आपल्या रिपब्लिक या ग्रंथात असे म्हटले आहे की, "द्वंद्व पध्दती ही एकमेव द्वंद्व पध्दती आहे. पहिल्या सिध्दांतापर्यन्त सरळ पोहचणारी आणि तीच एकमेव अशी वैज्ञानिक पध्दती आहे." तो पुढे म्हणतो की, चिंतनाची ही द्वंद्ववादी पध्दत मनुष्याच्या बौध्दिक प्रतिभेचे अतिउच्च व क्रियाशील असे रूप आहे.

## ३) शुभतत्त्व
### (The Idea of the Good)

प्लेटोने शुभतत्त्वांचा विचार केल्याचे दिसते. शुभतत्त्व म्हणजे दुसरे तिसरे काही नसून 'चांगल्याची संकल्पना' या संकल्पनेलाच (The idea of the good) असे म्हणतात. प्लेटोनी सांगितलेल्या सारतत्त्वाचा (Idea) शेवट हा शुभतत्त्वात होत असल्याचे दिसुन येते. या तत्वाचा विचार करीत असताना प्लेटोने सांगितलेले 'अनुभव' या तत्त्वाचाही विचार करावा लागतो. त्याने अनुभवाचे दोन प्रकार सांगितले आहे १) इंद्रियसंवेदन २) बुध्दी ग्रहण

या विश्वातील ज्या काही भौतिक वस्तू आहेत त्या इंद्रियांना समजत असतात. उदा. पर्वताची उंची, आकाशाचा रंग इत्यादी बाबी नेत्रइंद्रियाला समजतात. आंबा गोड आहे का आंबट आहे ? या विषयीचे ज्ञान जिभेला म्हणजेच रससंवेदनाच्या माध्यमातून समजू शकते.

"प्लेटो म्हणतो की, या सर्व भौतिक वस्तू परिवर्तनीय सापेक्ष तसेच भासणाऱ्या असतात.

बुध्दीच्या माध्यमातून जे ज्ञान प्राप्त होते, ते ज्ञान अपरिवर्तनीय व स्थिर राहते. प्लेटो पुढे म्हणतो की, सारतत्त्वाशिवाय जे काही अस्तित्वात आहे ते पूर्णपणे असत्य म्हटले पाहिजे. भौतिक विश्वातील कोणतीही वस्तू किंवा घटना ही आकाररूप सारतत्त्वे व असत् या दोन्हीमध्ये असतात आणि या सर्व वस्तू अंशतः खऱ्या असतात. इंद्रयांना प्रतीत होणाऱ्या वस्तू विविध स्वरूपात दृष्टीत येत असल्या तरी या सर्वामध्ये ऐक्याच्या रूपाने व्यक्त होणारी सारतत्त्वे मात्र एकच असतात. प्लेटोने सांगितलेल्या सारतत्वाचे स्वरूप पुढील स्वरूपात विशद करता येईल.

१) [illegible]


[illegible] (सत्ता) अस्तित्वात आहे, या ठिकाणी त्याने एकोच सत् [illegible] विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.




वास्तविक पाहता एक व अनेक या दोन्हीत समानता असण्याचे कारण नाही. उलट यामध्ये एकप्रकारचा विरोधाभास आहे असे मानले जाते. जर प्लेटोने एकमेव अशा वस्तूला सत्य मानले असेल तर अनेका विषयी काय ? असा प्रश्न पडतो. म्हणूनच हे विविधत्व म्हणजे एक प्रकारचे मिथ्या होय व या विविधत्वाची परिणती शुभतत्त्वात होते. अशा रीतीने या अति उच्चतत्वात सामान्य गुणधर्म समाविष्ट झालेले असतात.

## २) सर्वोच्च सारतत्त्वे म्हणजे शुभ तत्त्व

सारतत्त्वांमध्ये एक प्रकारची श्रेणी असते. ज्याप्रमाणे प्रथमश्रेणी, द्वितीय श्रेणी, तृतीय श्रेणी इ. श्रेणी असतात तसेच काहीसे स्वरूप सारतत्त्वामध्ये आहे. अर्थातच तृतीय श्रेणीपेक्षा द्वीतीय श्रेणीला महत्वाचे स्थान आहे. द्वितीय श्रेणीपेक्षा प्रथम श्रेणीला महत्त्वाचे स्थान आहे त्याच प्रमाणे पिरॅमिड मधील सगळ्यात वरच्या टोकाला असणारी सारतत्त्वांना अतिउच्च सारतत्त्वे म्हणावे लागेल. थोडक्यात असे म्हणता येईल की, व्यापक गुणधर्म दाखविणारी जास्तीत जास्त अशी एका पेक्षा एक उच्च सारतत्त्वे अस्तित्वात असतात. ज्याला आपण उच्च idea म्हणतो तिच्याहून एखादी उच्च idea पुन्हा तिच्याहून उच्चतम idea असू शकते म्हणजेच या ठिकाणी कुठेतरी चढती श्रेणी आहे., अशा रीतीने या अनेक idea चे प्रारूप पिरॅमिडसारखे असते, या पिरॅमिडचा आकार जणू एका त्रिकोणासारखा असतो. त्याचा खालचा भाग (पाया) म्हणजे काहीसा रूंद व वरील भाग निमुळता होत जातो, त्याची आकृती पुढिलप्रमाणे असल्याची कल्पना करता येवू शकते.



खालील रुंद पायामध्ये, या भौतिक विश्वातील विविध अशा विशिष्ट वस्तू असतात. या सर्वांना व्यापणारी काही सारतत्त्वे वरच्या बाजूने असतात. म्हणजेच या ठिकाणी श्रेणीमध्ये वाढ असल्याचे दिसून येते, अशा रीतीने वरच्या पातळीवर सारतत्त्वे विस्तारित होत जातात या श्रेणीमध्ये सर्वोच्च अशी जी idea असते त्या idea ला प्लेटो अतिशय महत्त्व देतो. ही idea म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून हेच शुभतत्त्व (The idea of the Good) होय.

1 शुभतत्त्व हे सर्वव्यापक व सर्वश्रेष्ठ म्हणजेच अंतिम सत् होय. हे शुभतत्त्व अखिल जगताची व अस्तित्वाची धारणा करीत असते.

३) सारतत्त्वाची परिणीती शुभतत्त्वात.

सारतत्त्वे ही नेहमीच वेगवेगळ्या प्रकारची असतात उदा. वाघ, पर्वत, व्यक्ती, समुद्र यासारख्या भौतिक वस्तूंच्या idea असतात. त्याचप्रमाणे गुणधर्मांच्याही idea असतात उदा. गोडपणा, कृष्णत्व तसेच सत्य, शिव, सौंदर्य, न्याय या सारखी नैतिक सारतत्त्वेही असतात. केवळ नैसर्गिक वस्तूंची सारतत्त्वे असतात असे नाही, तर पुस्तक, कपाट, खुर्ची या सारख्या मानव निर्मित वस्तूंच्याही idea असतात. एवढेच नव्हे तर हिंसा, विद्रूप अशी गुणधर्म व्यक्त करणारी सारतत्त्वे असतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, ज्या ज्या गोष्टींची संकल्पना तयार करणे शक्य आहे. त्याच्या ठिकाणी सारतत्त्वाचे अस्तित्व असते. शेवटी असेच म्हणावे लागेल की, सारतत्त्वे जरी भिन्न असल्या तरी त्यांची परिणिती शुभतत्त्वात होते.

४) भौतिक जगतातील वस्तूंची अपूर्णता व शुभ तत्त्वाचे प्रकाशकिरण.

प्लेटोने idea चे जे स्वरूप विशद केले आहे. यावरून त्याची 'सत्ताप्रणाली' प्रयोजनरूपी असावे असे वाटते. या विश्वातील सर्व वस्तू मग ती विशेष वस्तू असो वा मर्यादित वस्तू असो किंवा विशिष्ट अशी घटना असो. ज्वालामुखी, भूकंप या सर्व वस्तू अर्धवट असतात. म्हणजेच असत्य असतात अशी प्लेटोची भूमिका आहे असे असले तरी या सर्व वस्तू शुभतत्त्वाच्या प्रकाश किरणात समजू शकतात असे प्लेटोचे म्हणणे आहे.



५) मूल्यवाचक सारतत्त्वे

प्लेटोने आपल्या तत्त्वज्ञानात मूल्यवाचक सारतत्त्वाचा उल्लेख केला आहे. सत्य, शिव, सुंदर, न्याय, पवित्र या सारख्या ज्या संकल्पना आहेत, त्याचा अनुभव इंद्रियांना येवू शकत नाही तर त्यांची प्रचिती फक्त बुध्दीला येवू शकते. प्लेटोच्या दृष्टिकोणातून हा भाग अतिशय महत्त्वाचा आहे म्हणूनच तो म्हणतो की अशा प्रकारे ज्या काही मूल्यवाचक संकल्पना आहेत त्या सर्व शुध्द idea होत. या संदर्भामध्ये त्याने केलेले विधान पुढील स्वरूपाचे आहे. "जर मी नैतिक सारतत्त्वांना माझ्या डोळ्यांनी पाहण्याचा प्रयत्न केला किंवा अन्य इंद्रियाच्या सोहयाने पाहण्याचा प्रयत्न केला तर, याची मला भीती वाटते व माझी बुध्दी ही पूर्णपणे आंधळी होऊन जाईल", त्याच प्रमाणे त्याने लिहिलेल्या रिपब्लिक ग्रंथातही तो पुढील स्वरूपाचे विधान करतो. नैतिक idea ह्या फक्त जाणल्या जातात, परंतु त्या प्रत्यक्ष पाहू शकत नाहीत. शेवटी प्लेटोची भूमिका काय असू शकेल, या प्रश्नाचे सहजच असे उत्तर देणे भाग पडते की, अशा प्रकारच्या idea चे ज्ञान आम्हाला जन्माच्या अगोदर किंवा जन्माच्या वेळी प्राप्त होऊ शकते अर्थात प्लेटोने लिहिलेल्या फीडो या ग्रंथात हाच आशय स्पष्टपणे व्यक्त झाल्याचे दिसते.

६) अंतिम तत्त्व : शुभ

प्लेटोच्या तत्त्वज्ञानात अंतिम सत्याचा विचार आलेला आहे. अंतिम तत्त्व काय आहे ? या प्रश्नावर प्लेटोचे उत्तर आहे - 'एक' (one) या एकमेव व्यतिरिक्त अन्य काही नाही, असा भाव येथे व्यक्त होतो. स्वतःच्या पार्मेनिडीज या ग्रंथात तो म्हणतो की, - "जर एकमेव (one) असे काही नाही तर मग काहीच नाही. पुढे अन्य ठिकाणी त्याने या 'एक' चा संबंध शुभ (Good) शी जोडल्याचे दिसते. थोडक्यात, त्याला असे म्हणावयाचे आहे की, हे एक व 'शुभ' या दोन्हीचाची पूर्णपणे तादात्म्यमय (Identity) होत." १

Q.No 2 ४) प्लेटोची ईश्वरविषयक भूमिका

प्लेटोच्या तत्त्वज्ञानात शुभ (Good) व ईश्वर ही दोन्ही ही तत्त्वे सांगितलेली आहेत. ईश्वराचे अस्तित्व त्याला मान्य आहे. या अर्थाने त्याला

आस्तिक तत्त्ववेत्ता मानला जातो. मात्र प्लेटोचे ईश्वर विषयक विचार समजून घेत असताना शुभ तत्त्वाचा विचार करणे अपरिहार्य ठरते. प्रथमतः त्याची ईश्वरविषयक भूमिका कोणती ते पाहून, शुभ व ईश्वर या दोन्हीतील संबंध कसे आहेत ते पाहावे लागेल.

प्लेटोला आस्तिक तत्त्वज्ञ हीच उपाधि लावण्यात आलेली आहे. त्याने सांगितलेले ईश्वर विषयक विचार पुढीलप्रमाणे -

१) ईश्वराचे विविध रूप

प्लेटो हा स्वतः धर्मनिष्ठ व ईश्वराचे चिंतन करणारा तत्त्ववेत्ता होता. त्याने लिहिलेल्या 'लॉ' या ग्रंथात असे म्हटले आहे की, सर्वात मोठेपद (Highest post) जर कोणते असेल तर, परमेश्वराची सेवा करण्याचे जे कोणते मंडळ असेल त्या मंडळातील, हा अधिकारी म्हणजे एक मोठी व्यक्ती होय. ईश्वर हा अपरिवर्तनशिल आहे, ते सर्वोच्च तत्त्व आहे त्याच प्रमाणे तो कायिक, वाचिक व मानसिकदृष्ट्या पूर्णपणे सत्य आहे. तो कधीच कोणालाही दुःख देऊ शकत नाही. आपल्या थीटीट्स या ग्रंथात तो म्हणतो की, परमेश्वराला अधर्माचा थोडाही स्पर्श (सावली) नसतो. पुढे रिपब्लिक या ग्रंथात असे म्हटले आहे की, ईश्वरामध्ये अशुभाचे नावसुध्दा नाही. ईश्वर हा शुभ आनंददायी व रक्षणकर्ता आहे.

२) काळकर्ता ईश्वर :

आपण ज्या काळामध्ये जीवन व्यतीत करतो, मग तो भूतकाळ असो, वर्तमानकाळ असो किंवा भविष्यकाळ असो 'काळाला' वगळून जीवन अशक्य आहे. अशा या महत्त्वपूर्ण काळाची निर्मिती ईश्वराने केली आहे, अशी प्लेटोची भूमिका आहे. तो पुढे म्हणतो की, या सृष्टीच्या रचनेबरोबर ईश्वराने काळाची रचना केली आहे प्लेटोन आपल्या 'रिपब्लिक' या ग्रंथात असे स्पष्ट सांगितले आहे की, ईश्वर हा सृष्टीकर्ता आहे.

३) ईश्वर : भावी जीवनाचा मार्गदर्शक

'प्लेटो हा नेहमीच सत्य व शुभ या विषयी आदराने बोलत असतो. विवेकी बुध्दीला महत्त्व देणाऱ्या प्लेटोने नेहमीच अस्तिकतेचा पुरस्कार केला आहे. प्लेटो या संदर्भात असे म्हणतो की, मनुष्याने विवेकपूर्ण वर्तन निर्माण करावे. ते त्याचे एक प्रकारचे साध्यच होय. अशा प्रकारच्या वृत्तीने माणूस ईश्वरी योजनेच्या जवळ जातो व पुढील जीवनात त्याला सुख प्राप्ती होवू शकते.

४) विश्वकारण युक्तिवाद :

या विश्वाच्या पाठीमागे निश्चीतच असा एक उद्देश आहे. 'उद्देश' हे वेगवेगळ्या प्रकारचे असू शकतात. त्यामध्ये एक प्रकारची विविधता असते, या विविध उद्देशावर ईश्वराचा एक प्रकारे प्रभाव असतो. या विश्वामध्ये एक प्रकारची समरूपता आहे. माणसे काळी, गोरी, उंच, बुटकी अशी कशीही असली तरी, मनुष्य म्हटल्यानंतर एक निश्चीत रूप नजरेसमोर येते. थोडक्यात वस्तुमध्ये भिन्नता असली तरी 'उद्देशप्राप्ती' हा भाग महत्वाचा आहेच. म्हणून प्लेटो म्हणतो की 'उद्देश' हेच विश्वाचे समर्पक कारण आहे.

५) वस्तूंची उत्पत्ती व ईश्वर :

प्लेटोने ईश्वराला जगाचे निमित्त कारण मानले आहे. खरे म्हणजे ईश्वर हा अमुक अशा कोणत्याही वस्तूची उत्पत्ती करीत नाही. मात्र मन आणि प्रकृती यांच्यातील शक्ती व अन्य सर्व क्रिया या विषयीचे ते अधिष्ठान आहे. मात्र या संदर्भात महत्त्वाची बाब अशी आहे की, प्लेटोने ईश्वराला कधीच सर्वोच्च मानले नाही त्याने शिवतत्त्वाला अंतिम तत्त्व मानले व शिवतत्त्व आणि ईश्वर यांच्यातील फरक जसास तसा कायम ठेवला.

६) शुभ व ईश्वर

प्लेटोने सांगितलेल्या ईश्वराचा विचार करीत असताना, शुभतत्त्वाच्या (Good) कल्पनेशिवाय ईश्वराची कल्पना करणे शक्य नाही. म्हणूनच या ठिकाणी या दोघांचा काय संबंध आहे ? ते पाहणे आवश्यक ठरते.

प्लेटोचे एकंदर तत्त्वज्ञान पाहता, असताना शिवतत्त्व हे परमतत्त्व आहे का ? ईश्वर हे परमतत्त्व आहे या विषयी काहीशी संदिग्धता वाटते. काही ठिकाणी

तर त्याने एक ईश्वर (One God) व बहू ईश्वर अशी प्रकारची भाषा वापरल्याचे दिसते. ईश्वराचे वर्णन करीत असताना तो निर्माता, नियंता, आदिराज्य चालविणारा आहे अशा प्रकारचे हे वर्णन दिसून येते. एकवेळेस ईश्वराचे असे हे महत्त्व सांगितल्यानंतर अन्य कोणत्याही परमतत्त्वाचे महत्त्व सांगण्याची गरज काय ? असे वाटू लागते, मात्र प्लेटो ईश्वराबरोबरच शुभतत्त्वाचे एवढे महत्त्व वर्णितो की जणू काही शुभतत्त्वालाच परमतत्त्व मानतो. त्याच्या एकंदर विचारात असे स्पष्ट होते की, शुभतत्त्व हे अंतिम सत्ता आहे. मग साहजिकच असा प्रश्न पडतो की प्लेटोने सांगितलेले शुभतत्त्व अंतिम आहे का ईश्वर हे अंतिम आहे ? या संदर्भाचा विचार करीत असताना, या दोन्हींचे संबंध पाहणे आवश्यक ठरते. अर्थात, हे संबंध कसे आवश्यक ठरतात. अर्थात हे संबंध कसे असू शकतील, या विषयीची कल्पना झेलर नावाच्या विचारवंताने केली आहे आणि या कल्पनेतच कोणते दोष येऊ शकतात. याचाही विचार त्याने केला आहे.

झेलरने सांगितलेले ईश्वर व शुभतत्त्व यातील संबंध सापेक्ष सांगण्यात आले आहे ते पुढील प्रमाणे :

१. समजा ईश्वराला शुभतत्त्वाचे अधिष्ठान मानण्यात आलेले आहे, म्हणजेच प्रथमत: ईश्वर आणि त्यानंतर शुभतत्त्व असा जर क्रम मानला तर शुभतत्त्वाचे महत्त्व धोक्यात येते, कारण शिवतत्वाला त्याने स्वतंत्र्य व आदि द्रव्य मानले आहे अशा तऱ्हेने ही एक समस्या निर्माण होते.

२. समजा शुभतत्त्व हे अंतिम असून तेच सर्वश्रेष्ठ आहे आणि ईश्वर हा शुभतत्त्वावर अवलंबून आहे, असे मानल्यास ईश्वराविषयी जे वर्णन करण्यात आले आहे ते वर्णन चुकीचे आहे की काय असे वाटू लागते. ईश्वर तर अविनाशी आहे, सार्वभौम आहे, असा हा अनादि ईश्वर अन्य एखाद्या घटकावर कसा काय अवलंबून राहू शकेल ? असा प्रश्न पडतो, म्हणून या संदर्भात निर्माण होणारी ही दुसरी समस्या ठरते.

३. समजा असे मानले की, ईश्वर आणि शुभतत्त्व ही दोन्हीही अंतिम तत्त्वे होत. असे जरी मानले तरी, काही अडचणी निर्माण होतात. कारण स्वत: प्लेटोने अशा प्रकारचे कधीच विधान केले नाही, एवढेच नव्हे तर ईश्वराचा विचार करीत असताना त्याने ईश्वराचे महत्त्व सांगितले आहे आणि शिवतत्त्वाचे वर्णन



करत असताना त्याच्या महत्त्वामध्ये कोठेच अभाव दर्शविला नाही. मग अशा वेळी कोणते तत्त्व श्रेष्ठ व कोणते तत्त्व कनिष्ठ ? यावर काय निर्णय द्यावा, असा प्रश्न पडतो शिवाय कोणत्याही सुसंवादी विचार प्रणालीत अशा प्रकारची दोन अंतिमतत्त्वे सांगणे चुकीचे वाटते. ज्याप्रमाणे एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत, त्याच प्रमाणे एकाच सुसंवादी प्रणालीत अशा प्रकारची दोन सार्वभौम तत्त्वे असू शकत नाहीत, असे म्हणणे सहज शक्य आहे. म्हणूनच सांगण्यात आलेला हा पर्याय सुध्दा दोषयुक्त वाटतो. म्हणून शेवटी असा एक निष्कर्ष काढावासा वाटतो, तो असा की, ईश्वर आणि शुभतत्त्व हे दोन शब्द वेगवेगळ्या रूपात वापरत असले तरी अंतिम सत्ता एकच असून ईश्वर व शुभतत्व एकरूप आहे.

Q. No. 3 ~~४) सतसंकलपना~~

## Idea of Plato

प्लेटोच्या तत्त्वज्ञानात सत्‌संकल्पना (idea) या भागाचे विवेचन केले आहे. त्या विषयीचे विवेचन पुढील स्वरूपात आहे.

प्रत्येक वस्तूमध्ये काही गुणधर्म असतात. वस्तूतील परिवर्तित होणारा असा जो काही भाग असतो, तो संवेदनाला जाणवतो विचाराचे (Thought) मात्र तसे नाही. विचार हा नेहमीच समान वस्तूत अस्तित्वात असणाऱ्या समान गुणधर्माविषयी विचार करीत असतो. उदा. 'अ' नावाची व्यक्ती हसते, ब नावाची व्यक्ती हसते, 'क' नावाची व्यक्ती हसते याचा अर्थ ' माणसे ही हसणाऱ्यापैकी असतात ' असा निष्कर्ष काढला जातो. संवेदनाला जाणवणाऱ्या भागास, प्लेटोने आकार (Form) म्हटले आहे. उदा. वाघ, षट्कोन, सरोवर, पर्वत इत्यादी, आकार होत. प्रत्येक वेगवेगळ्या आकाररूपी प्रवर्गात अस्तित्वात असणाऱ्या वाघी कितीतरी असू शकतात या जगात अशा वस्तू जन्मतात, आणि त्याचा लयही होतो मात्र या सर्वामध्ये असणारा वर्गआकार एकच असतो. वाघ, षट्कोन, पर्वत इत्यादी गोष्टी इंद्रियांच्या कक्षेत येतात. या सर्व वस्तू कुठेतरी शाश्वत नसल्याचे जाणवते. आज दिसणारा वाघ, काही वर्षांनी त्याचा मृत्यू होणार, पर्वत जरी दिसायला प्रचंड मोठे वाटत, असले तरी ते आहे त्या स्थितीत कायम राहू शकत नाहीत. मात्र सर्व वाघात वसत असणारा ' व्याघ्रत्व ' नावाचा जो गुण आहे तो कधीच लोप

पाहू शकत नाही. दिसणारा वाघ आज आहे उद्या नसेल, त्याचप्रमाणे आज दिसणारे मूल, उद्या ते मूल म्हणून राहणार नाही कदाचित त्याचे रूपांतर युवकात, वृध्दत्वात होईल किंवा मृत्यू पावेल मात्र शिशुत्व नावाची बाब कधीच नाहीशी होणार नाही. थोडक्यात असे म्हणता येईल, की वाघ, गाय, शिशू या सर्व वस्तू नाहीशा होतील परंतु व्याघ्रत्व, गोत्व, शिशुत्व या बाबी कधीच नाहीशा होणार नाहीत. प्लेटो म्हणतो की खऱ्या अर्थाने याच वस्तू सत्य होत. इंद्रियांना जाणवणाऱ्या विशिष्ट अशाश्वत वस्तू या असत्य असतात. प्लेटोने सांगितले की, या idea चे स्वरूप केवळ मानसिक स्तरावरील नाही तर त्याच्या मते या वस्तू वास्तव आहेत. तो म्हणतो की, जगात ज्या काही वस्तू आहेत, त्या सर्वांच्या आयडिया (idea) असतात. एवढेच नव्हे तर राग, लोभ, प्रेम यासारखे गुणधर्म पिता-पुत्र, गुरू-शिष्य, आई-वडील या सर्वांमध्ये असणारा संबंध एवढेच नव्हे तर शिकणे-शिकविणे, पळणे या सारख्या क्रिया, इत्यादी बाबतीतही सत्संकल्पना असू शकतात.

प्लेटोने सांगितलेल्या आयडिया या मानवी मनात निर्माण होणाऱ्या केवळ कवीकल्पना नसून त्याला वास्तव स्वरूप आहे, या (idea) म्हणजे एक प्रकारचे सार होय. अनेक वाघ, अनेक पर्वत, अनेक गायी पाहून त्यातील सामान्य गुणधर्म किंवा केवळ प्रतिमा म्हणजे प्लेटोची आयडीया नव्हे. त्याच प्रमाणे या ठिकाणी केवळ वैगमनिक पध्दतीचा वापर करून काढण्यात आलेला निष्कर्ष नव्हे. 'विशिष्ट वाघ किंवा विशिष्ट पर्वत पहावयाचे आणि मग सगळयांना लागू होईल असे विधान करायचे', असा प्रकार म्हणजे प्लेटोची आयडीया नव्हे तर या उलट प्लेटोने सांगितलेली सारतत्त्वे (ideas) ह्या स्वतःच्या आयडीयांना स्वतःचेच एक अधिष्ठान आहे.

प्लेटोने सांगितलेल्या सारतत्त्वांमध्ये त्या त्या वस्तूचे सार [illegible] असले तरी, हे सार म्हणजे त्यांचे अस्तित्वच होय. हे अस्तित्व कोणत्याही मनावर किंवा एखाद्या मानवी क्रियेवर आधारीत असते, असे मात्र म्हणता येत नाही. याचाच अर्थ 'आयडीया' ह्या स्वयंपूर्ण असतात.

६) सारतत्त्वाची (Idea) वैशिष्ट्ये

सारतत्त्वाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगण्यात येतात.

१) आयडिया संख्यात्मक असतात

प्लेटो असे म्हणतो की, idea ह्या नेहमीच संख्येमध्ये अस्तित्वात असतात. अर्थात यामध्ये वेगवेगळया प्रकारचे वर्ग असतात. उदा. 'वस्तू' म्हटल्यानंतर पलंग गादी, पुस्तक, माणूस, फळा, इत्यादी. 'रंग' म्हटल्यानंतर काळा, पिवळा, हिरवा जांभळा, निळा इत्यादी. 'स्वभाव' म्हटल्यानंतर रागीट, हळवा, प्रेमळ, दयाळू इत्यादी. 'संबंध', म्हटल्यानंतर एकरूपता, समानता, पृथ्थकपणा इत्यादी. तसेच 'मूल्य' म्हटल्यानंतर सत्य, शिव सुंदर इत्यादी.

या ठिकाणी प्रथमतः असे सांगण्यात आले आहे की, idea या संख्यात्मक असतात ज्याप्रमाणे रंग म्हटल्यानंतर, वर जे विविध रंग सांगण्यात आले आहेत, ते कुठेतरी संख्येत सांगता येणे शक्य आहे. मात्र निश्चित किती प्रकारचे रंग आहेत? किती प्रकारचे गुण ? या बाबतीत निश्चीत संख्या किती ? हे सांगता येत नसले तरी, कुठेतरी त्याचे मोजमाप करता येऊ शकते.

प्लेटोच्या, या विचारावरून प्रतीकात्मक तर्कशास्त्रातील विधेय तर्कशास्त्राची आठवण होते. या शास्त्रात 'सर्व मानव मर्त्य आहेत' किंवा 'सर्व फुले सुवासिक असतात', या सारख्या विधानात संख्यादर्शक भाग असतो म्हणूनच वरील विधानाचे चिन्हांकन (x)(Hx ⊃Mx); (x)(Fx ⊃Cx) असे करण्यात येते. अर्थातच या ठिकाणी सुध्दा किती माणसे मर्त्य असतात ? किती फुले सुवासीक असतात ? या प्रश्नाचे निश्चीत उत्तर देता येत नसले तरी, या ठिकाणी संख्येचा प्रश्न निर्माण होतो, असेच काहीसे स्वरूप idea चे आहे.

२) आयडीया चा संबंध अमूर्ततेशी

वास्तवता आणि अमूर्तता या दोन संकल्पना तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात विद्यमान आहेत. वास्तवता म्हणजे प्रत्यक्षात जे दिसते ते, व अमूर्तता म्हणजे जे इंद्रियाच्या साहयाने ज्ञात होऊ शकत नाही असे ! उदा. पाप, पुण्य, ईश्वर या कल्पना प्रत्यक्ष इंद्रियाने दिसू शकत नाहीत. प्लेटो म्हणतो की idea चे स्वरूप असेच काहीसे आहे त्याचे स्वतःचे एक स्थान आहे व हे स्थान पूर्णपणे वेगळे आहे. म्हणूनच त्यांना सारतत्त्वाचे स्वर्ग (Heaven of the ideas) असे म्हणतात. पुढे तो म्हणतो की, या दृश्यमान जगाहून आयडीयांचे जग पूर्णपणे वेगळे आहे.

म्हणजेच प्लेटोने जगाचे दोन प्रकार केल्याचे दिसते. १) वास्तव जग २) स्वर्गीय जग

प्लेटोच्या या विचारातून त्याचे द्वैती तत्त्वज्ञान (dualism) आकारास आल्याचे दिसते.

## ३) आयडीया ह्या वैश्विक असतात

प्लेटोच्या idea ह्या वैश्विक (universal) स्वरूपाच्या असतात. त्या नेहमी भौतिक वस्तूच्या तुलनेत उच्च स्वरूपाच्या असतात. सृष्टीत दिसणाऱ्या वस्तू व सारतत्त्वात्मक वस्तू या दोन्हीचे श्रेष्ठत्व व कनिष्ठत्वाच्या दृष्टीने विचार केल्यास सारतत्त्वे ही नेहमीच उच्च असतात. प्लेटो म्हणतो की खरे म्हणजे सारतत्वे हीच प्राथमिक होत. तसेच ते एक मौल्यवान असे द्रव्य असून, बाकीच्या सर्व वस्तू त्याच्या प्रतिमा होत.

## ४) आयडीया अमानसिक व अभौतिक

प्लेटोने वर्णन केलेल्या idea ह्या मानसिक (Mental) नाहीत किंवा भौतिक (Material) नाहीत. एवढेच नव्हे तर, त्या मनुष्य किंवा ईश्वर यांच्या पासूनही पूर्णपणे स्वतंत्र आहेत. तरीपण त्यांचे स्वरूप पूर्णपणे समर्पक (Appropriate) आहे. जर सारतत्त्वांना मानसिक किंवा भौतिक पातळीवर आणून ठेवल्यास वास्तव स्वरूपावर बाधा येण्याची शक्यता आहे, आणि त्यांची स्वतंत्रता व समर्पकता नाहीशी होऊ शकेल.

## ५) आयडीयाचे नित्यत्व

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात दिक् आणि काल या संकल्पनेची चर्चा वेळोवेळी होते. काही तत्त्ववेत्त्यांनी दिक् (space) व काल (time) या बाबींना अंतिम मानले आहे. दिक् चे अस्तित्व केव्हा संपुष्टात येईल ? किंवा काळाची सुरूवात केव्हा झाली ? काळ केव्हा नष्ट होईल ? या प्रश्नाचे उत्तर देत असतांना, अनेक समस्या निर्माण होतात शेवटी असे वाटू लागते की, दिक् व काल यांना सीमा नाहीत. म्हणून या दोन बाबी अंतिम आहेत.



प्लेटोने सांगितलेल्या idea मात्र दिक् व काळाच्याही पुढे जातात. त्या दिक् व काळापासून ही अंतरावर आहेत. म्हणूनच, खऱ्या अर्थाने idea या अंतिम होत अशी त्याची भूमिका आहे. तो म्हणतो की या दृश्यमान विश्वातील सर्व वस्तू परिवर्तनीय आहेत. मात्र idea ह्या नित्य आहेत. त्याच्यामध्ये कसल्याही प्रकारचे परिवर्तन होऊ शकत नाही. पुढे तो म्हणतो की, 'भौतिक वस्तू ह्या नेहमी बदलत असतात; त्यांचे निश्चित असे कोणतेही स्थान नसते.'

## ६) श्रेणीयुक्त आयडिया

आयडियामध्येही एक प्रकारची श्रेणी असते. ज्याप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये श्रेणी असते. उदा. प्रथमश्रेणी, द्वितीय श्रेणी, तृतीय श्रेणी अशीच काहीशी 'श्रेणी' प्लेटोने सांगितलेली आहे. Idea मध्ये ही एक प्रकारची श्रेणी असते. काही Idea उच्च तर काही Idea निम्न असतात. मात्र सर्वोच्च Idea म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून शुभ (Good) हेच सर्वोच्च Idea होय अशी प्लेटोची भूमिका आहे. मात्र समस्त सारतत्त्वामध्ये एक प्रकारचा समन्वय (Co-ordination) शक्य आहे.

## ७) अतींद्रिय जगतात आयडीयाचे वास्तव्य

प्लेटो म्हणतो की idea चे वास्तव्य हे अतींद्रिय जगतात असते. त्यांची प्रचीती इंद्रियाने होत नसून, बुध्दीच्या साहयाने होते. १५ +१० = २५ ही कल्पना इंद्रियाच्या साहयाने समजू शकत नाही. तर प्रज्ञेच्या साहयाने समजणे शक्य आहे. त्याच प्रमाणे idea चे स्वरूप आहे.

## ८) आयडीया : वास्तव वस्तू नव्हे.

प्रत्येक जाती वर्गाशी अनुरूप फक्त एकच idea अस्तित्वात असते. उदा. व्याघ्रसारतत्व एकच आहे. तथापि याच्या अंतर्गत, सृष्टीतील अनेक वाघ मोजले जाणे शक्य आहे. म्हणूनच अनेक वाघाच्या अनुषंगाने, व्याघ्रत्वाची संकल्पना पुढे आली. मात्र व्याघ्रत्व ही वस्तू वास्तवात आहे काय ? अर्थातच याचे उत्तर 'नाही' असे आहे. प्लेटोने रिपब्लिक या ग्रंथात पुढीलप्रमाणे आशय व्यक्त केला

आहे.

"जर एकाहून अधिक जाती-वर्ग विषयवस्तू असतील तर, शेवटी एकच खरे सारतत्त्व असेल."

## ९) सारतत्वे निरावयव असतात.

अवयवी वस्तू आणि निरवयवी वस्तू असे वस्तूंचे दोन प्रकार करून सारतत्वाची माहिती घेणे शक्य आहे. जेव्हा आपण 'वाघ' या शब्दाचे वर्णन करू लागतो, त्यावेळेस चार पाय, दोन डोळे, ठिपका असलेला, पिवळा रंग, बलशाली, शक्तिमान या वर्णनाने त्या प्राण्याची माहिती घेत असतो. म्हणजेच या अवयवाच्या सहाय्याने त्या त्या वस्तूचे ज्ञान होत असते. मात्र काही वस्तू निरावयवी असतात. उदा. काळा, पिवळा, पांढरा इत्यादी. या वस्तूचे वर्णन करावयाचे असेल तर, तशाच प्रकारची दुसरी वस्तू दाखवून, त्याचे ज्ञान घेता येणे शक्य आहे. थोडक्यात, कोणताही रंग हा निरवयवी असतो. प्लेटो म्हणतो की, सारतत्त्वे ही सुध्दा निरवयवी असतात कारण जे काही समिश्र (Composite) असते, त्याचे केव्हाही विभाजन होवू शकते आणि ते नष्टही होऊ शकते. सारतत्वाचे स्वरूप ही तसेच आहे. सारतत्वे ही नेहमीच निरवयवी असल्यामुळे ती नष्ट होण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकत नाही.

## ७) प्लेटोच्या तत्त्वज्ञानांची विशेषता

### १) पाश्चात्याची सारतत्वे:प्लेटोचे आधारस्तंभ

युरोपियन तत्त्वज्ञानाच्या इतिहासात, जो काही सारतत्व विषयक विचार सांगण्यात आलेला आहे, त्या सर्व विचारांचे अधिष्ठान प्लेटो हा तत्त्वज्ञ आहे. सेंट ऑगस्टाइन, सेंट थॉमस, इर्विन या सर्व विचारवंतांनी काही विचार सांगितलेले आहेत. त्याचा मूळ धागा म्हणजे प्लेटोचे तत्त्वज्ञान! ऑगस्टाइन या तत्त्ववेत्त्याने ईश्वर अस्तित्वाविषयी बोलताना असे म्हटले आहे की, ईश्वराविषयीची संकल्पना (सार) प्र. नेद. मनुष्याच्या अंतःकरणात अगदी सुरुवातीपासूनच असते. पुढे तो म्हणतो की उदात्त जीवन जगण्यासाठी, अशा प्रकारच्या भुवत सारत्... उल्लेख करावा लागतो. तसेच त्याचे स्पष्टीकरणही करणे गरजेचे वाटू लागते. अन्सलेम नावाच्या विचारवंतानेही, सारतत्वांना उच्च दर्जा दिल्याचे दिसते. व त्या आधारे तो ईश्वराचे अस्तित्व मान्य करून, त्याने त्याला अंतिम तत्त्वाचा दर्जा दिला आहे. ऑगस्टाइन व अन्सलेम या दोन्ही तत्त्ववेत्त्यांच्या विचारावर प्लेटोचा प्रभाव पडल्याचे दिसते. एवढेच नव्हे तर हेगेल, ब्रॅडले, बोझांके, रॉइस या आधुनिक काळातील विचारवंतानी, सांगितलेली सारतत्वे प्लेटोच्या तत्त्वज्ञानावरच आधारित असल्याचे दिसून येते. हेगेल या विचारवंताचे असे म्हणणे आहे की, 'सत्य हे विवेकशील आहे, विवेकशील हे सत्य आहे' अशा प्रकारच्या विधानाचा उल्लेख करून शेवटी तो म्हणतो की, idea हयाच सत्य होत. हेगेलचा काळ प्लेटोच्या नंतर जवळ-जवळ २२०० वर्षाचा आहे. मात्र एवढ्या कालावधी नंतरही त्यावर प्लेटोचा प्रभाव पडल्याचे दिसून येते.



### २) गूढवाद : मोक्ष तत्त्वज्ञानाचे समर्थन

प्लेटो हा एक गूढवादी तसेच मोक्षाला महत्त्व देणारा अध्यात्मवादी तत्त्ववेत्ता होता. त्याच्या तत्त्वज्ञानामध्ये ध्यान, धारणा, योग वगैरे संकल्पनांचाही उल्लेख आल्याचे दिसते. अर्थातच या पाठीमागे त्याने सांगितलेल्या सारतत्त्वविचाराचा प्रभाव दिसून येतो. ख्रिश्चन गूढवादी तत्त्वज्ञानावरही, प्लेटोच्या विचाराचा प्रभाव दिसून येतो. या दृष्टिकोनातून प्लेटोच्या तत्त्वज्ञानाला महत्त्व द्यावे लागेल.

### ३) बौध्दिक कसरत महत्वाची

प्लेटोने idea चे विवेचन करून एकप्रकारची बौध्दिक कसरतच केली आहे असे म्हणावे लागेल. भौतिक जगतात जी एक सुसंबध रीतीने चाललेली व्यवस्था आहे, व ज्याचे ज्ञान फक्त प्रज्ञेला होऊ शकते, त्याचा आधार हा एका अतीत अशा अस्तित्वात असू शकतो, हे प्लेटोने दाखवून दिले आहे.

प्लेटोची ही कल्पना विचारांती मनास पटू लागते. जेव्हा मनुष्य अत्यंत बारकाईने विचार करू लागतो, त्यावेळेस अमूर्त स्वरूपात का होईना, खरोखरच आपण एका सत्याकडे जात आहोत, असे वाटल्याशिवाय राहात नाही. प्लेटो